# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक २०३ वा ❑ भारतीय सौर दिनांक १० आश्विन शके १९४८, शुक्रवार दि.०२ ऑक्टोंबर २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य:निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### टेलिकॉम कंपन्यांची मक्तेदारी: आता ग्राहक क्रांतीची गरज

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

भारतासारख्या विकसनशील देशात, जिथे शिक्षण, बँकिंग, आणि सरकारी सेवा पूर्णपणे इंटरनेटवर अवलंबून आहेत, तिथे काही मोजक्याच खाजगी टेलिकॉम कंपन्यांचे बाजारावर नियंत्रण असणे ग्राहकांसाठी आणि देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी घातक ठरू शकते.टेलिकॉम क्षेत्रातील वाढती मक्तेदारीआणि मोजक्या कंपन्यांच्या वर्चस्वामुळे ग्राहकांना आणि एकूणच अर्थव्यवस्थेला कोणत्या आव्हानांना सामोरे जावे लागत आहे, यावर सध्या मोठी चर्चा सुरू आहे. भारतासारख्या मोठ्या बाजारपेठेत ही मक्तेदारी मोडून काढणे का गरजेचे आहे.

गेल्या काही वर्षांत भारतात मोबाईल रिचार्जचे दर लक्षणीयरीत्या वाढले आहेत, ज्याचा थेट फटका सामान्य ग्राहकांच्या खिशाला बसत आहे.

जेव्हा बाजारात फक्त २ किंवा ३ मोठे कंपन्या असतात तेव्हा ग्राहकांना निवडीचे स्वातंत्र्य राहत नाही. कंपन्या जे नियम आणि प्लॅन्स लादतील, ते ग्राहकांना नाईलाजाने स्वीकारावे लागतात. स्पर्धा संपल्यामुळे कंपन्या दरवर्षी त्यांचे प्लॅन्स महाग करत आहेत. ग्राहकांकडे पर्याय नसल्याने त्यांना सक्तीने जादा पैसे मोजावे लागत आहेत.

गेल्या काही वर्षांत ग्राहकांच्या खिशाला मोठा कात्री लावला आहे. सातत्याने होणारी दरवाढ आणि कंपन्यांच्या रणनीतीमुळे सर्वसामान्यांमध्ये तीव्र संताप आहे.खाजगी टेलिकॉम कंपन्यांनी (जसे की , आणि ) विविध क्लृप्त्या वापरून ग्राहकांकडून जास्त पैसे उकळले आहेत, ज्याला सामान्य भाषेत डिजिटल लूट म्हटले जाते.ग्राहकांची लूट करण्यासाठी टेलिकॉम कंपन्यांनीकंपन्यांनी मासिक प्लॅनच्या नावाखाली २८ दिवसांची वैधता देण्यास सुरुवात केली.प्रत्येक महिन्यात २ ते ३ दिवस कमी झाल्यामुळे, ग्राहकाला वर्षातून १२ ऐवजी १३ वेळा रिचार्ज करावा लागतो. म्हणजेच कंपन्या ग्राहकांकडून एका अतिरिक्त महिन्याचे पैसे वसूल करतात.

कंपन्यांनी जुलै २०२४ मध्ये प्रीपेड आणि पोस्टपेड प्लॅन्सचे दर १५ ते २५ टक्क्यांनी वाढवले. एवढंच नव्हे, तर २०२६ च्या उत्तरार्धातही कंपन्यांकडून पुन्हा एकदा १२% ते १५% दरवाढीची तयारी सुरू असल्याचे संकेत मिळाले आहेत. ५ नेटवर्कचा विस्तार आणि प्रति युझर उत्पन्न वाढवण्याच्या नावाखाली ही दरवाढ लादली जात आहे.

सुरवातीला ५ डेटा मोफत देणाऱ्या कंपन्यांनी आता ग्राहकांना ५ सेवा वापरण्यासाठी महागडे प्लॅन्स (उदा. रोज २ किंवा त्यापेक्षा जास्त डेटा असणारे प्लॅन्स) घेण्याची सक्ती केली आहे. यामुळे कमी बजेट असलेल्या ग्राहकांना नाईलाजाने जास्त पैसे मोजावे लागत आहेत.

जर ग्राहकाने २८ दिवस संपल्यानंतर लगेच रिचार्ज केला नाही, तर काही दिवसांतच त्याची इनकमिंग सेवा (येणारे कॉल्स) देखील बंद केली जाते. सिम कार्ड चालू ठेवण्यासाठी दरमहा किमान रिचार्ज करणे बंधनकारक करण्यात आले आहे, ज्यामुळे फक्त फोन चालू ठेवू इच्छिणाऱ्या गरीब किंवा वृद्ध ग्राहकांची मोठी आर्थिक कोंडी होते.

न वापरलेला डेटा रात्रीच रिसेट करणे (डिजिटल लूट)

ग्राहकांनी दिवसासाठी दिलेल्या कोट्यापैकी (उदा. १.५ ) डेटा पूर्ण वापरला नाही, तर उरलेला डेटा मध्यरात्री रिसेट (शून्य) केला जातो. ग्राहकाने पूर्ण पैसे देऊनही त्याचा हक्काचा डेटा पुढील दिवशी वापरू दिला जात नाही.

आजकाल मोबाईल कंपन्यांच्या नियमांमुळे इच्छा नसतानाही फक्त सिम कार्ड चचालू ठेवण्यासाठी ग्राहकांना दरमहा विनाकारण पैसे खर्च करावे लागत आहेत. आधी लोक इनकमिंग कॉल्ससाठी दुसरं सिम कार्ड वापरायचे, पण आता कंपन्यांनी कमी किमतीचे प्लॅन्स बंद करून ग्राहकांवर एकप्रकारे सक्तीच केली आहे.

लोकशाहीत आणि खुल्या बाजारपेठेत ग्राहकाला निवडीचे स्वातंत्र्य असले पाहिजे. फक्त दोन कंपन्यांचे पर्याय असणे म्हणजे एक प्रकारे निवडीचे स्वातंत्र्य हिरावून घेण्यासारखे आहे.

टेलिकॉम क्षेत्रातील मक्तेदारी ही केवळ ग्राहकांच्या खिशाला कात्री लावणारी नाही, तर देशाच्या डिजिटल प्रगतीला खिळ घालणारी आहे. इंटरनेट ही आता प्रत्येकाची मूलभूत गरज असल्याने, या क्षेत्रातील स्पर्धा जिवंत ठेवण्यासाठी सरकारने आणि ट्रायने तात्काळ हस्तक्षेप करण्याची गरज आहे.

खासदार राघव चड्ढा यांनी संसदेत उठवलेल्या आवाजानंतर आणि ग्राहकांच्या वाढत्या तक्रारींनंतर, दूरसंचार नियामक प्राधिकरणने ऑक्टोबर २०२६ पासून नवीन कडक नियम लागू केले आहेत

कंपन्यांना आता ग्राहकांसाठी पूर्ण ३० दिवसांची व्हॅलिडिटी असलेले प्लॅन्स देणे बंधनकारक केले आहे, जे दर महिन्याला त्याच तारखेला रिन्यू होतील.

फक्त कॉलिंग आणि एस एम एस प्लॅन्स ज्यांना इंटरनेट नको आहे, अशा ग्राहकांसाठी कंपन्यांना डेटा नसलेले स्वस्त व्हॉइस आणि एसएमएस व्हाउचर्स उपलब्ध करून द्यावे लागत आहेत.

टेलिकॉम कंपन्यांची वाढती मक्तेदारी आणि सातत्याने होणारी दरवाढ हा सध्या सामान्य ग्राहकांसाठी अत्यंत चिंतेचा विषय बनला आहे. बाजारात मोजक्याच कंपन्या उरल्यामुळे ग्राहकांकडे पर्याय संपत चालले आहेत. या परिस्थितीवर मात करण्यासाठी आता खरोखरच एका मोठ्या ग्राहक क्रांतीची आणि धोरणात्मक बदलांची गरज आहे.

# गांधीजींचे जीवन हाच त्यांचा संदेश

ज्योतिर्मय साहित्य

महात्मा गांधी हे केवळ भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचे नेते नव्हते, तर ते सत्य, अहिंसा, प्रेम, समानता, स्वावलंबन आणि माणुसकीचे जिवंत प्रतीक होते. त्यांच्या जीवनातील प्रत्येक कृतीमागे एक विचार होता आणि प्रत्येक विचार त्यांच्या आचरणातून व्यक्त होत होता. म्हणूनच गांधीजींच्या जीवनाकडे पाहताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवतेगांधीजींचे जीवन हाच त्यांचा संदेश होता.

साने गुरुजींनी 'बापूजींच्या गोड गोष्टी' या पुस्तकातून महात्मा गांधींच्या जीवनातील अनेक प्रसंग अत्यंत साध्या, मनोरंजक आणि हृदयस्पर्शी पद्धतीने सांगितले आहेत. या गोष्टी लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांनाच वाचनीय आहेत. त्या केवळ मनोरंजन करत नाहीत, तर गांधीजींच्या जीवनमूल्यांची ओळख करून देतात.

गांधीजींच्या मते केवळ साक्षरता किंवा विद्वत्ता माणसाला खऱ्या अर्थाने 'माणूस' बनवत नाही. जीवन जगण्यासाठी, जीवन समृद्ध करण्यासाठी आणि माणुसकी जपण्यासाठी घेतलेले शिक्षणच खरे शिक्षण होय. त्यांच्या शिक्षणविषयक विचारांतही हीच व्यापक दृष्टी दिसते. त्यांच्या मते, मुलांच्या किंवा माणसाच्या शरीरात, बुद्धीत आणि आत्म्यात जे काही श्रेष्ठ आहे, ते पूर्णपणे बाहेर आणणे म्हणजे शिक्षण.

त्यांच्या जीवनाचा केंद्रबिंदू होतासत्य. सत्याची तुलना त्यांनी एका विशाल वृक्षाशी केली. आपण त्याचे जितके प्रेमाने संगोपन करू, तितकीच त्याला अधिक फळे येतील. सत्य बाहेर कुठेतरी शोधण्यापेक्षा प्रत्येक माणसाच्या अंतःकरणात त्याचे वास्तव्य आहे, असा गांधीजींचा विश्वास होता. म्हणूनच माणसाने सत्याचा शोध सर्वप्रथम स्वतःच्या अंतर्मनात घ्यायला हवा.

गांधीजींच्या जीवनातील सत्यनिष्ठेचे अनेक प्रसंग आपल्याला त्यांच्या छोट्या-छोट्या गोष्टींतून अनुभवायला मिळतात. स्वतःची चूक मान्य करणे, प्रामाणिकपणे वागणे आणि आपल्या आचरणातून सत्य सिद्ध करणेहीच त्यांच्या जीवनाची खरी ताकद होती.

गांधीजींनी समानता आणि प्रेम यांना माणुसकीचा आधार मानले. माणसांचे बाह्य रूप, भाषा, जात, धर्म किंवा परिस्थिती वेगवेगळी असली तरी मानवी मन सर्वत्र एकच आहे, असा




त्यांचा विश्वास होता. त्यामुळे समाजात भेदभाव नष्ट करून समानता आणि प्रेमाची भावना निर्माण करणे, यातच खरी माणुसकी आहे.

श्रमालाही गांधीजींच्या विचारांत विशेष स्थान होते. प्रत्येक माणसाने आपल्या जगण्यासाठी शारीरिक श्रम केले, तर श्रमाची प्रतिष्ठा वाढेल आणि समाज अधिक स्वावलंबी बनेल. माणसाने स्वतःचे काम स्वतः करण्याची वृत्ती जोपासली, तर परावलंबित्व कमी होईल आणि जीवन अधिक अर्थपूर्ण बनेल. अशा श्रमशील आणि स्वावलंबी समाजातूनच गांधीजींना एका सुंदर जगाची कल्पना होती.

गांधीजींच्या जीवनात साधेपणा होता,पण त्या साधेपणामागे अत्यंत व्यापक विचार होता. त्यांचा पोशाख, त्यांचे राहणीमान, त्यांचे आहार-विहार, त्यांचे श्रम आणि त्यांचा संघर्षया प्रत्येक गोष्टीत सामान्य माणसाशी एकरूप होण्याची भावना होती. त्यांनी जे सांगितले ते स्वतः प्रथम आचरणात आणले.

म्हणूनच गांधीजींचे जीवन एखाद्या ग्रंथासारखे आहे. त्यातील प्रत्येक पान आपल्याला काहीतरी शिकवतेसत्याने जगा, प्रेमाने वागा, अन्यायाविरुद्ध अहिंसेने उभे रहा, श्रमाची प्रतिष्ठा जपा, स्वतःमध्ये परिवर्तन घडवा आणि प्रत्येक माणसात माणूसपण पाहा.




आजच्या वेगवान आणि स्पर्धात्मक जीवनात गांधीजींच्या विचारांची गरज अधिक जाणवते. शिक्षणाने केवळ बुद्धी विकसित न होता मन, शरीर आणि आत्म्यातील श्रेष्ठत्व जागे झाले, तरच शिक्षणाला खरा अर्थ प्राप्त होईल. सत्याची कास धरली, समानता आणि प्रेमाची भावना जोपासली आणि श्रमाला सन्मान दिला, तर समाज अधिक सुंदर होऊ शकतो.

शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते

गांधीजींनी जगाला केवळ विचार दिले नाहीत; त्यांनी ते विचार स्वतःच्या जीवनातून जगून दाखवले. म्हणून त्यांचे जीवनच त्यांचा संदेश आहे. त्यांच्या जीवनातील प्रत्येक कृती आपल्याला माणूस म्हणून जगण्याची दिशा देते आणि म्हणूनच गांधीजींच्या जीवनाचा खरा अर्थ त्यांच्या सांगण्यात नव्हे, तर त्यांनी जगून दाखवलेल्या मूल्यांत आहे. सत्य, अहिंसा, प्रेम, समानता आणि माणुसकी यांचा मार्ग त्यांनी स्वतः चालून दाखवला. गांधीजींचे जीवन केवळ इतिहास नाही, तर प्रत्येक पिढीला माणूस म्हणून जगण्याची प्रेरणा देणारा जिवंत संदेश आहे.

# भारतीय निसर्गोपचाराचे जनक : महात्मा गांधी

ज्योतिर्मय साहित्य

महात्मा गांधी थोर विचारवंत, सत्याग्रही होते. सत्य,अहिंसा या तत्त्वांचे पूजक होते. संपूर्ण जग त्यांना भारताचे राष्ट्रपिता म्हणून ओळखते.

ब्रिटिश राजवटीचा विरोध करणारे महात्मा गांधी पाश्चात्य देशाच्या वैद्यकीय उपचार पद्धतीचे कडवे विरोधक होते. प्राचीन भारतीय निसर्गोपचाराच्या अभ्यासातून त्यांनी जाणीवपूर्वक या उपचार पद्धतीचा प्रचार आणि प्रसार केला. मानवी आरोग्य हे निसर्गोपचाराच्या तत्त्वज्ञानावर आधारित आहे असे त्यांचे स्पष्ट मत होते .अध्यात्मिक स्वावलंबन आणि मानवी शरीराचे आरोग्य हे फक्त निसर्गाच्या माध्यमातूनच साध्य होऊ शकते असा त्यांचा ठाम विश्वास होता .आरोग्य ही शरीर मन आणि आत्मा यांच्यातील सुसंवादाची व्यवस्था आहे ,निसर्गाच्या मूलभूत नियमांच्या पालनाने ही व्यवस्था टिकून राहते असे ते मानत .महात्मा गांधींनी आरोग्य तत्त्वज्ञानाची बरीचशी तत्वे सांगितली आहे त्यात ते प्रामुख्याने स्वतःचे शरीर हेच उपचारक आहे असे मानतात. जर शरीराला नैसर्गिक घटकांची सोबत मिळाली तर स्वतःला औषधाविना बरे करण्याची क्षमता शरीरात आहे असे त्यांनी लक्षात आणून दिले .पशुपक्षी प्राणी हे निसर्गाचे नियमांचे काटेकोर पालन करतात .पाहिजे तेवढे खाणे ,सूर्यप्रकाशात फिरणे, रात्र झाल्यावर झोप घेणे, स्वच्छ हवेमध्ये वावर या कारणांमुळे पक्षी आजारी पडत नाही .पण माणूस मात्र वारंवार निसर्ग नियमांची पायमल्ली करत असतो. त्यामुळे अलीकडे विविध आजार डोके वर काढताना दिसत आहेत. शहरी भागात हे प्रमाण चिंताजनक आहे निसर्ग नियमां विरुद्ध केलेला हिंसाचार म्हणजेच शरीराने नोंदवलेला निषेध असतो त्यालाच आपण



आजारपण म्हणतो .जसे -अति खाणे, अस्वच्छता, असे त्यांनी लक्षात आणून दिले. महात्मा गांधींचा उपचारापेक्षा प्रतिबंधावर जास्त विश्वास होता .आजारी पडल्यावर बाह्य उपचार घेतल्यापेक्षा दैनंदिन शिस्तीने आरोग्य टिकवावे असे ते म्हणत. औषधोपचारांना ते गुलामगिरीचा प्रकार मानत. साधे,




घरगुती नैसर्गिक उपचारांना भारतीयांनी प्रोत्साहन दिले पाहिजे म्हणजे गरिबांनाही ते परवडतील असे ते सांगत असत. निसर्गोपचाराच्या सखोल अध्ययनानंतर त्यांनी शरीराचा समतोल राखण्यासाठी पाच तत्वांचा वापर करण्याचा आग्रह केला

१) पृथ्वी-- मृदा चिकित्सा

पचनाच्या समस्यांसाठी ते पोटावर मातीचा लेप लावत.

२) जल --जलचिकित्सा

ताप आणि सूज येणे यावर उपचार करण्यासाठी ते कटीस्नान, थंड पाण्याच्या पट्ट्यांचा वापर करत असत.

३) आकाश -- उपवास

गांधीजी उपवासाला" सर्वोत्तम शुद्धीकरण "मानत असत. यामुळे पचनसंस्थेला विश्रांती मिळते आणि शरीराची जीवनशक्ती बरे होण्यावर केंद्रित होते हे त्यांनी वारंवार प्रयोगातून सिद्धही केले होते.

४ ) वायू ---वायूचिकित्सा

ताज्या हवेत फिरणे ,मोकळ्या हवेत झोप घेणे, खोल आणि लयबद्ध श्वासो श्वासाचा सराव करणे हेही आरोग्यासाठी लाभदायक आहे असे त्यांनी सांगितले होते .

५ ) अग्नी --सूर्य, सूर्य प्रकाश

सूर्य स्नानाची शिफारस त्यांनी वारंवार केलेली आपल्याला दिसून येते.

गांधीजींनी जीवनशैलीस शिस्त लावण्यास काही सुधारणा ही सांगितल्या होत्या जसे की ,

आहार सुधारणा

सात्विक आणि शाकाहार मानवी शरीरासाठी सर्वोत्तम असल्याचे म्हणत. फळे, भाज्या, सुकामेवा, संपूर्ण धान्य याचा त्यांनी आग्रह केलेला दिसून येतो.दुधाचा त्यांनी त्याग केला होता परंतु वैद्यकीय सल्ल्यानुसार त्यांनी बकरीचे दूध आहारामध्ये समाविष्ट करण्यास योग्य मानले होते .

शारीरिक श्रम

ब्रेड लेबर या पद्धतीवर त्यांचा प्रचंड विश्वास होता प्रत्येकाने शारीरिक श्रम करावे असा त्यांचा आग्रह असायचा चालणे, घरकाम करणे, शरीराला सक्रिय ठेवणे हाही निसर्ग उपचाराचाच एक प्रकार आहे असे ते मानत.

अध्यात्मिक साधना: रामनाम -

मानसिक आणि शारीरिक सुखासाठी व्यक्तीने प्रार्थना आणि ईश्वराचे नामस्मरण करावे असे ते वारंवार सांगत. यालाच त्यांनी नैसर्गिक उपचार क्रमांक एक असे सुद्धा म्हटले होते.

ब्रह्मचर्य

इंद्रियांवर संयम ठेवून जीवनशक्तीचे जतन करणे यालाच यालाच ते ब्रह्मचर्य असे म्हणत असत. दीर्घकालीन आरोग्यासाठी आणि दीर्घायुष्यासाठी मनुष्याच्या जीवनाला शिस्त असणे आवश्यक आहे असे त्यांनी सांगितले.

वारसा

निसर्गोपचारा प्रती असलेल्या निष्ठेमुळे १९४६ मध्ये उरुळी कांचन येथे त्यांनी पहिला निसर्ग उपचार आश्रम स्थापन केला आजही निसर्गोपचाराचे केंद्र म्हणून हा आश्रम कार्यरत आहे. महात्मा गांधींनी आरोग्याची गुरुकिल्ली हे पुस्तकही लिहिले. हे पुस्तक भारतीय निसर्ग उपचारपद्धती चा मूलभूत ग्रंथ मानला जातो. निसर्ग उपचाराचे अनन्यसाधारण महत्त्व लक्षात आल्या नंतर १८ नोव्हेंबर १९४५ रोजी ऑल इंडिया नेचर फाउंडेशन ट्रस्टचे ते आजीवन सदस्य बनले होते. २०१८ पासून निसर्गोपचार क्षेत्रातील त्यांच्या या योगदानाचा सन्मान करण्यासाठी १८ नोव्हेंबर राष्ट्रीय निसर्गोपचार दिन म्हणून भारतात साजरा करण्यात येतो.

दोन ऑक्टोबर महात्मा गांधी जयंती निमित्ताने हा लेख सविनय पाठवत आहे कृपया स्वीकार करावा.






# जात्यावरच्या ओव्या......

बैलपोळ्याचा सण
वेश गर्दीनं दाटली
उधळला पोळा
हलगी कडाड वाजली ||८६८||

बैलपोळ्याचा सण
वेशीमधी भरला पोळा
ऐकुन जयजयकार
हसला शंभु भोळा ||८६९||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ७६

ज्योतिर्मय साहित्य

**अहो ज्या नरा रामविश्वास नाही ।**
**तया पामरा बाधिजे सर्व काही ।**
**महाराज तो स्वामी कैवल्यदाता ।**
**वृथा वाहने देहेसंसारचिंता ।।७८।।**

अर्थ : ज्या मनुष्याचा परमेश्वरावर विश्वास नाही, त्या माणसाला ( पामराला ) सर्व प्रकारची संकटे त्रास देतात. भगवंत महाराज म्हणजे राजांचा राजा आहे, या विश्वाचा स्वामी म्हणजे मालक आहे, तो कैवल्यदाता म्हणजे मोक्ष देणारा आहे. असा हा सर्वशक्तिमान परमेश्वर आपली काळजी वाहण्यास समर्थ असताना आपण उगाच देहाची आणि संसाराची चिंता करीत बसतो.

( पामर - क्षुद्र /हीन /दीन / दुबळा, बाधणे - त्रास होणे, कैवल्यदाता - मोक्ष देणारा, वृथा - व्यर्थ )




विवेचन : आधीच्या श्लोकात समर्थांनी श्रीरामावर निष्काम श्रद्धा ठेवून त्याचे नामस्मरण केल्यास मनातील द्वंद्व नाहीसे होते. सर्व जीवांच्या मध्ये तो एकच परमात्मा व्यापून राहिला आहे असा साक्षात्कार होतो असे सांगितले आहे. या श्लोकात ज्याचा रामावर विश्वास नाही अशा माणसाचा खरपूस समाचार समर्थ घेतात. अशा माणसाला ते पामर म्हणतात. पामर म्हणजे क्षुद्र, हीन. गरीब आणि पामर यात फरक करता येतो. गरीब माणूस आपल्या कर्तृत्वाने स्वतः ची उन्नती करून घेऊ शकतो. परंतु हा त्या दृष्टीने महामूर्खच म्हणावा लागेल. कारण आपले हित कशात आहे हे त्याला कळत नाही. ज्यांची परमेश्वरावर श्रद्धा नाही, अशा माणसांना समर्थ पामर म्हणतात. मग तो ऐहिक दृष्ट्या भलेही श्रीमंत असेल, पण पारमार्थिक दृष्ट्या अभागी आणि हीन दीन.

असा माणूस आर्थिक दृष्ट्या भलेही सधन असेल पण प्रपंचात




येणाऱ्या संकटांनी तो खचून जातो. प्रपंचातील संकटांचे तडाखे भल्याभल्यांना सोसवत नाहीत. छोट्यामोठ्या गोष्टींनीही अशी माणसे विचलित होतात. समर्थांच्या शब्दात सांगायचे तर अशा माणसांना संसार आणि त्यातील अडचणी बाधक ठरतात. पण ज्यांची रामावर श्रद्धा आहे, अशा माणसांना प्रपंचातील संकटे विचलित करीत नाहीत. त्यांना संकटे येत नाहीत असे नाही. पण भगवंतावर सर्व भार टाकल्यामुळे त्यांना अशा गोष्टींचा त्रास होत नाही. या श्लोकात भगवंताच्या गुणांचे वर्णन करताना समर्थ तीन विशेषणे वापरतात. तो महा राज आहे, स्वामी आहे आणि कैवल्यदाता आहे. महाराज म्हणजे महान राजा. राजांचा राजा. रामराज्य होऊन आज हजारो वर्षे लोटली तरी रामराज्याची कल्पना आजही लोकांना भावते. रामराज्य म्हणजे आदर्श राज्य होते. राम हा आदर्श राजा. दुसरी गोष्ट म्हणजे तो या चराचराचा स्वामी आहे. इंग्रजी शब्द वापरायचा तर तो सुप्रीम पॉवर आहे. या विश्वाचा निर्माता, पालनकर्ता आणि संहारकर्ता तोच आहे. तिसरी गोष्ट म्हणजे तो कैवल्यदाता आहे. कैवल्यदाता म्हणजे मुक्ती किंवा मोक्ष देणारा. ज्याने ज्याने रामनाम घेतले, तो तरून गेला. मग तो वाल्या कोळी असेल, भक्त प्रल्हाद असेल, रामनाम घेणारी शबरी असेल किंवा अहिल्या असेल. हनुमंत आणि बिभीषण हे रामाचे भक्त तर चिरंजीव झाले. **(क्रमशः)**



ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏

## || संजय उवाच... ||

@संजय काव्या पुणे 7743918559



♦आत्मविश्वास
कोणतेही काम करताना ते मला व्यवस्थित जमणार आहे हे मनाशी ठेवा आणि कामं करा म्हणजे ते नक्कीच होते, त्यासाठी आधी आपला आत्मविश्वास मजबूत असणे जरुरी आहे. आत्मविश्वासच यशाचं मोठं गमक आहे.

# नामाचे सूक्ष्म स्वरूप



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नुसते 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल हा प्रश्न माणूस सहजच विचारतो, आणि त्याला दाखला म्हणून म्हणतो की, समजा एखादा मनुष्य 'नोकरी नोकरी' असा जप करीत खोलीत बसला, तर त्याला नोकरी मिळणे शक्य आहे का ? वरकरणी हा दाखला अगदी बेमालूम दिसतो खरा, पण थोडासा विचार केला, तर तो इथे मुळीच लागू पडत नाही, असे कळून येईल. जो दाखला द्यायचा, आणि ज्या बाबतीत तो द्यायचा, त्यांचे गुणधर्म सारखे असावे लागतात. 'रामनाम' आणि 'नोकरी' यांचे परिणाम एकमेकांविरूद्ध आहेत. 'राम राम' म्हणण्याचा शेवट रामप्राप्तीत म्हणजे स्वतः:च्या विस्मरणात होत असतो; म्हणजे देहबुद्धीतून देहाच्या पलीकडे जाणे, म्हणजे स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे, हा 'राम राम' म्हणण्याचा परिणाम. परंतु नोकरीचा प्रकार याच्या अगदी विरुद्ध आहे. मुळात नोकरी ही कल्पना सूक्ष्म आहे. नंतर, ती मिळावी म्हणून दहाजणांचे आर्जव करायचे, त्याच्यानंतर ती देणारा भेटायचा, आणि मग आपण ती नोकरी करायची. म्हणजे नोकरी या कल्पनेतून, सूक्ष्मातून, स्थूलात जाणे हा नोकरीचा प्रकार. पण ' राम राम ' म्हणणे हा प्रकार स्थूलांतून सूक्ष्माच्याही पलीकडे जाण्याचा आहे. यावरून, नोकरीचा हा दाखला इथे लागू पडत नाही हे स्पष्ट होते. दुसरी गोष्ट म्हणजे 'नोकरी नोकरी' असा जप करून नोकरी मिळणे कठीण हे तर खरेच, पण 'राम राम' म्हणून राम मिळणे कसे सोपे, किंबहुना कसे हमखास शक्य आहे हे पहा. नोकरी म्हणजे मुळात कल्पना असून, ती प्रत्यक्षात आणण्याकरिता इतर अनेक गोष्टींची कशी जुळवाजुळव करावी लागते, हे आपण आत्ताच पाहिले. तसेच, घर बांधणे ही कल्पना; ती पुरी करून ते घर सर्व बाजूंनी सुखसोयीचे आगर व्हावे या हेतूने सर्व जिनसा पैदा करून त्यात आणून ठेवणे, म्हणजेच कल्पनेतून कृतीत येण्याचा प्रकार झाला. आता हे करणे किती कष्टाचे आणि अनिश्चीत आहे याचा अनुभव सर्वांना आहे. 'राम राम' म्हणण्याचे उद्दिष्ट, स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे हे आहे; म्हणजेच, अगदी सर्व बाजूंनी परिपूर्ण आणि भरलेले घर एकेक वस्तू फेकून देऊन रिकामे करण्यासारखे आहे. ही गोष्ट करण्याची इच्छा असल्यास कोणालाही सहज होण्यासारखी आहे. तेव्हा 'नोकरी नोकरी' म्हणून नोकरी मिळणे जितके कठीण, तितकेच 'राम राम' म्हणून राम मिळणे निश्चीत आहे. सबब 'राम राम' म्हणून राम कसा भेटेल अशी शंका न घेता' राम राम' जपावे.

मनाच्या सर्व दुःखाला कारण देहबुद्धी आहे. ती जायला उपाय एकच: प्रेमाने भगवंताचे नामस्मरण करावे. त्याच्या योगाने सर्व मल जाईल. नामस्मरणच रामाची गाठ घालून देईल. चित्तात तशी तळमळ मात्र पाहिजे. 'मी' पणा टाकावा आणि परमात्म्याचे होऊन राहावे.

जो नाम घेतो त्याला देहाच्या सुखदुः खाची जाणीव राहणार नाही. तो आनंदात राहील.

***

# || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

## आपले सण आपले उत्सव
## पितृपक्ष

तिथवर हे अग्निश्वात पितृगण हे अन्न नेऊन पोहोचवितात. श्राद्धा दरम्यान पितरांचे नाव गोत्र उच्चारल्याने योग्य त्या जीवाला त्याच्या सध्याच्या योनीत ते अन्न मिळते.

यज्ञोपवीताचे अपसव्य करून कुशावर दिल्या गेलेल्या गेलेले तीन पिंड पितरांची संतुष्टी करतात. पितरे ज्या ज्या योनीत आहेत त्या त्या योनी प्रमाणे त्यांना आहार प्राप्त होतो.

हजारो गाईच्या झुंडीतून तिचे वासरू बरोबर आपल्या आईला जसे ओळखते तसे पित्रांचे निमित्त ब्राह्मणांना दिल्या गेलेले भोजन बरोबर त्या त्या जीवा पर्यंत पोहोचते.

*सदाहारा भवंतेते पितरो यत्र योनीषु/
तासू तासु तदाहारा: श्राद्धांन्नेनो
प्रतिष्ठती//*

पितृगण सदैव विश्वे देवांचे सोबत अन्नग्रहण करतात हेच विश्वे देव श्रद्धांजली पितरांना तृप्ती देतात.

■ विश्वेदेव कोणते?

पितरांच्या आधी आवाहन केले जाणारे हे देव आहेत. महाभारताच्या अनुशासन पर्वा मधे विश्वे देवांना अग्नि मूखा असे म्हटले आहे. हे विश्व देव खालील प्रमाणे दहा आहेत

क्रतुर्दक्षो वसु: सत्य:काम:कालस्था ध्रुव:
रोचनो माधवश्चैव तथाचान्य पुरूरवा:
विश्वे देवा भवंतेते दश श्राद्धेशु पूजिता:

## सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



✍वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### शब्द-भाषा-संस्कृती

मित्रांनो आणि वाचकहो मी दोन दिवसापूर्वी आपल्या गृपवर "शब्द"व त्याचे महत्व सांगणारी कविता टाकली होती. त्यातून शब्दाचे महत्व समजतेच पण हेच शब्द पुढे भाषा बनतात.. म्हणून सर्व काही शब्दच सांगतात.. म्हणून शब्द - वाक्य - भाषा व संस्कृती समाज व शेवटी राष्ट्र असा हा साहित्यीक क्रम आपण लक्षात घ्या. काय.. बरोबर ना.. कारण भाषा हीच देशाचा संस्कृतीचा चेहरा असतो, तिच आपल्या वर्तमानाचा पाया असते. म्हणून भाषा संवाद माध्यम आहे. आजच्या काळातील नव्या पिढितील आक्रमक संवादाची भाषा ही प्रतिकाराची नवी भाषा आहे काय? जनरेशन झेडच्या नावाखाली?रूढ होत असलेली भाषा बदलत्या संवेदनशिलतेचे लक्षण आहे का? हिंसाचारी भाषेत आक्रमक ता येऊन करूणा कमी व कटुता वाढून वर्तन बदलते. मुले कुमार वयापासूनच आदर अनादराची भाषा शिकतात, ग्रहण करतात व तसेच आचरतात! आता तर मुले मोबाईल, सोशल मिडिया, व्हिडिओ सिरीज व डिजीटल मनोरंजनातून भाषा शिकत असतात, हे पालकवर्गाने येथे आवर्जून लक्षात घेतले पाहिजे!"

"भाषा जितकी धाडसी, तेवढी अभिव्यक्ती अधिक अस्सल"अशी एक चुकीची समजूतही रूजताना दिसते. हे चूक आहे. त्यामुळे नात्याचे स्वरूपही बदलू लागते मतभेद वाढून संवाद कमी होतो.. हा महत्वाचा धोका सर्वांनी ओळखावा! आपण आज ज्या भाषेत जगतो, त्याच भाषेत पुढची पिढी आपल्याला ओळखणार आहे. आज एवढी भाषा ओळख पुरे करतो मीही थांबतो. स्वस्थ राहा मस्त राहा सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे वाचत राहा सुप्रभात. गुड डे गुडमार्निंग.



# गुणकारी आलं (अद्रक )

ज्योतिर्मय साहित्य

आल्याचा वापर करून शरीरातील युरीक ॲसिड करू शकता कमी, जाणून घ्या सेवनाची पद्धत

आजकाल शरीरात यूरिक ॲसिड वाढणं ही एक कॉमन समस्या झाली आहे. खाण्या-पिण्याच्या चुकीच्या सवयी आणि चुकीची लाइफस्टाईल यामुळे अनेकांना ही समस्या होते. जेव्हा शरीरात यूरिक ॲसिड वाढतं तेव्हा सांधे, जॉईंट्समध्ये वेदना आणि सूज अशा समस्या होतात. जर वेळीच यावर उपचार केले नाही तर ही समस्या आणखी वाढू शकते. यूरिक ॲसिड कंट्रोल करण्यासाठी तुम्ही काही घरगुती उपायही करू शकता. जवळपास सगळ्याच किचनमध्ये मिळणारी एक गोष्टी ही समस्या दूर करू शकते. ही गोष्ट म्हणजे आलं.

यूरिक ॲसिड कमी करतं आलं

आल्याच्या चहापासून ते वेगवेगळ्या पदार्थांमध्ये समावेश केला जातो. याने पदार्थांची टेस्ट तर वाढतेच सोबच यात अनेक औषधी गुणही असतात. यातील अँटी-इन्फ्लेमेटरी आणि अँटी-ऑक्सिडेंट ने शरीरातील सूज कमी होते. तसेच आल्याने पचनक्रियाही चांगली होते. शरीरातील विषारी पदार्थ सुद्धा बाहेर निघण्यास मदत मिळते.

आलं कसं करतं काम?

आल्यामध्ये जिंजरोल्स नावाचं एक शक्तीशाली तत्व असतं, जे शरीरात यूरिक ॲसिड जमा होण्यापासून रोखतं. हे तत्व यूरिक ॲसिडचे क्रिस्टल बनण्याची प्रक्रिया हळूवार करतं. ज्यामुळे जॉईंट्समध्ये वेदना आणि सूज कमी होते. तसेच याच्या मदतीने शरीरात रक्तप्रवाह सुद्धा सुरळीत होतो. इतकंच नाही तर शरीरातील विषारी पदार्थ सुद्धा बाहेर निघतात.

आल्याचं सेवन करण्याची योग्य पद्धत

आल्याचं सेवन वेगवेगळ्या प्रकारे तुम्ही करू शकता. मात्र, याचा योग्य पद्धतीने वापर करणं गरजेचं आहे. तेच जाणून घेऊया...

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

आल्याचा चहा

आल्याचा चहा यूरिक ॲसिड कमी करण्यासाठी एक बेस्ट उपाय आहे. यासाठी ताज्या आल्याचे छोटे-छोटे तुकडे करा आणि ते पाण्यात उकडून घ्या. तुम्हाला हवं तर तुम्ही यात थोडं मध आणि लिंबाचा रसही टाकू शकता. याच चहाचं दिवसातून दोन वेळा सेवन करा.

आलं आणि हळदीचं मिश्रण

आलं आणि हळद दोन्हींमध्ये अँटी इन्फ्लेमेटरी गुण भरपूर असतात. या दोन्हींचं मिश्रण करून एक पेस्ट बवा आणि ही पेस्ट कोमट पाण्यात टाकून सेवन करा. याने यूरिक ॲसिड कमी करण्यास मदत मिळते.

आल्याचा रस

ताज्या आल्याचा थोडा रस काढून त्यात थोडा लिंबाचा रस टाका. हा रस सकाळी रिकाम्या पोटी सेवन करा. याने शरीर आतून डिटॉक्स होईल आणि यूरिक ॲसिडही कंट्रोल होईल.

आल्याचं तेल

आल्याचा तेलाचा सुद्धा तुम्हाला जॉईंट्समधील सूज आणि वेदना कमी करण्यास करू शकता. या तेलाने जॉईंट्सवर हलक्या हाताने मालिश करा. याने ब्लड सर्कुलेशन चांगलं होतं आणि वेदनाही कमी होतात.

काय काळजी घ्या?

आल्याचं जास्त सेवन केल्याने पोटात जळजळ होऊ शकते. त्यामुळे याचं सेवन कमी प्रमाणात करा.

जर तुम्हाला आरोग्यासंबंधी एखादी गंभीर समस्या असेल तर आल्याचं सेवन करण्याआधी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

****

# प्रभातपुष्प

## षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

### माझे गुरु

सदैव सादर वंदन
माझे गुरुच्या चरणी
मनोमन त्यांना पुजते
कृपा आशिर्वाद डोई
सदा ठेवावा गुरुंनी
हेचि मनोमन मागते

लेखणीची ही दौलत
गुरुरुपे मी पुजता
मन:शांती मज लाभते
गुरुची कृपा रहावी
सदैव माझ्या पाठीशी
आनंदाने जीवन जगते

# विश्वस्तता : महात्मा गांधीजींचा मूल्यवान दृष्टीकोण

**ज्योतिर्मय साहित्य**

२ ऑक्टोबर २०२६ रोजी महात्मा गांधींची १५७ वी जयंती स्वतंत्र भारत देश साजरी करत आहे. अहिंसा आणि नैतिकतेच्या आधारावर महात्मा गांधीजींनी भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे यशस्वी नेतृत्व केले. अहिंसा आणि सत्य ,सत्याग्रह व नैतिकता हेच त्यांच्या स्वातंत्र्य संकल्पनेचे मूलभूत शस्त्र होते. अहिंसा ही केवळ एक धार्मिक संकल्पना नसून ती एक सामाजिक शक्ती आहे .धर्माच्या चौकटीत बंदिस्त अहिंसेला सामाजिक स्वरूप देण्याचे प्रमुख कार्य भारतीय जनमानसात करत त्याद्वारे देश इंग्रजांच्या पारतंत्र्यातून मुक्त करत गांधीजींनी अहिंसेची शक्ती जगाला दाखवून दिली.



महात्मा गांधीजींनी आपले उच्च शिक्षण (वकिलीचे शिक्षण) इंग्लंडमधील युनिव्हर्सिटी कॉलेज लंडन () येथे घेतले. बॅरिस्टर म्हणून भारतात परतल्यावर त्यांनी त्याचा व्यावसायिक वापर न करता उच्च शिक्षण देशहितासाठी कारणी लावले.भारतीय स्वातंत्र्य आणि आज सुद्धा भारताच्या अस्तित्वाबद्दल बोलायचे झाले तर महात्मा गांधींच्या नावाशिवाय ते अशक्य आहे.

भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळवून देणे इतकाच उद्देश न ठेवता पुढे देशाचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे यासाठी महात्मा गांधीजींनी अनेक विषयावर आपले विचार देशासमोर मांडले. त्यामध्ये ग्रामस्वराज्य, शिक्षण, नैतिकता, स्त्री शिक्षण, खेड्यांबद्दलची आत्मीयता, मजूर किंवा कामगारांबद्दल चे अधिकार विचार इत्यादी अनेक नीती वैचारिक पातळीवर स्पष्ट केल्या त्यामध्येच अपरिग्रहाच्या सिद्धांतावर आधारित विश्वस्तता किंवा ट्रस्टीशिप हा महत्त्वाचा सिद्धांत त्यांनी मांडला. या आधारावर आज अनेक संस्था सामान्य माणसाचे हित जोपासत उभ्या आहेत.

महात्मा गांधींची विश्वस्त संकल्पना (ट्रस्टीशिप थेअरी) हा त्यांच्या आर्थिक आणि नैतिक तत्त्वज्ञानाचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. गांधीजींनी १९०३ मध्ये हा सिद्धांत मांडला. समाजातील आर्थिक विषमता, शोषण आणि गरिबी दूर करण्यासाठी त्यांनी हा एक अहिंसक पर्याय सुचवला होता.

या संकल्पनेचे मुख्य विचार असा आहे

“ संपत्तीचा खरा मालक समाज आहे “

गांधीजींच्या मते, कोणत्याही भांडवलदाराकडे किंवा श्रीमंत व्यक्तीकडे असणारी त्याच्या आवश्यकतेपेक्षा अधिक संपत्ती ही त्याची वैयक्तिक मालमत्ता नसून ती समाजाची आहे. श्रीमंत व्यक्तीने स्वतःला त्या संपत्तीचा मालक न समजता, विश्वस्त म्हणजेच केवळ रखवाला समजावे.


© बलराज संघई
(एम.ए. अहिंसा शांति शोध)
छत्रपती संभाजीनगर
9420015108

अपरिग्रह अर्थात् आवश्यकतेपेक्षा जास्त संग्रह न करणे हे या सिद्धांताचे प्रमुख तत्त्व आहे. या सिद्धांताचा पाया अपरिग्रह या मूल्यावर आधारित आहे. व्यक्तीने आपल्या मूळ गरजा पूर्ण करण्यासाठी जितकी आवश्यक आहे तितकीच संपत्ती वापरावी. आपल्या गरजा भागल्यानंतर उरलेली अतिरिक्त संपत्ती कायदेशीररित्या समाजाच्या आणि गरिबांच्या कल्याणासाठी खर्च केली पाहिजे. असा विचार त्यांनी मांडला.

३. हृदयपरिवर्तन आणि अहिंसक मार्ग

गांधीजींचा साम्यवाद किंवा समाजवादाच्या बळजबरीने संपत्ती हिरावून घेण्याच्या (हिंसक) पद्धतीला विरोध होता. श्रीमंतांचे हृदयपरिवर्तन करून त्यांना स्वेच्छेने समाजाचे विश्वस्त बनवणे हाच आर्थिक समता आणण्याचा एकमेव शाश्वत आणि अहिंसक मार्ग आहे, असे गांधीजी मानत.

ही विश्वस्तता महात्मा गांधीजींनी दिलेली अत्यंत मूल्यवान अशी संकल्पना आहे. या आधारे स्वातंत्र्य व स्वातंत्र्योत्तर काळानंतर त्यांच्या या संकल्पनेचा मान ठेवत अनेक उद्योगपती, गर्भश्रीमंत, संपन्न व्यक्तींनी त्यांच्या मालमत्तेचे विश्वस्थीकरण करत अनेक ट्रस्ट भारतामध्ये स्थापन झाले आजही आहेत निर्माण होत आहेत आणि त्याद्वारे गरजूंना मदत मिळते , विद्यार्थ्यांना शिक्षण मिळते, औषधोपचार मिळतात. अपरिग्रह आणि संपत्तीचे विकेंद्रीकरण हा खूप मोलाचा महत्त्वाचा विचार देशाला देऊन महात्मा गांधीजींनी त्यांच्या काळापासूनच नव्हे तर भारताच्या पुढील उज्वल भविष्यासाठी सुद्धा एक मोठी व्यापक विचाराची देणगी दिलेली आहे.

***

# महात्मा गांधी यांचे स्वातंत्र्य लढ्यासोबत शैक्षणिक क्षेत्रातील योगदान

**ज्योतिर्मय साहित्य**

महात्मा गांधी हे केवळ भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे महान नेते नव्हते, तर शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्ती आणि समाज घडविण्याचा विचार मांडणारे द्रष्टे शिक्षणतज्ज्ञही होते. त्यांच्या मते स्वातंत्र्य म्हणजे केवळ परकीय सत्तेपासून मुक्ती नव्हे, तर प्रत्येक व्यक्तीला आत्मनिर्भर, चारित्र्यसंपन्न आणि जबाबदार नागरिक बनविणे होय.



गांधीजींनी ‘नई तालीम’ किंवा ‘बेसिक एज्युकेशन’ या संकल्पनेवर विशेष भर दिला. शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता ‘श्रमातून शिक्षण’ देणारे असावे, असा त्यांचा आग्रह होता. विद्यार्थ्यांनी हस्तकला, शेती, उद्योग किंवा अन्य उत्पादक कामांच्या माध्यमातून ज्ञान, कौशल्य आणि अनुभव मिळवावा, अशी त्यांची कल्पना होती.

त्यांच्या शिक्षणविचारात मातृभाषेला विशेष महत्त्व होते. विद्यार्थ्यांना त्यांच्या परिचित भाषेत शिक्षण मिळाल्यास विषय अधिक प्रभावीपणे समजतो आणि त्यांच्या विचारशक्तीला चालना मिळते, असा गांधीजींचा विश्वास होता.


प्रा अरविंद नागरिक,
संगणक विभागप्रमुख ,
एमआयटी पॉलिटेक्निक, छ. संभाजीनगर.
मो. 94204 02950

शिक्षणाने विद्यार्थ्यांमध्ये केवळ बौद्धिक क्षमता नव्हे, तर सत्य, अहिंसा, शिस्त, सहकार्य, स्वावलंबन आणि सामाजिक बांधिलकी यांसारख्या मूल्यांचीही जोपासना व्हावी, असे ते मानत.

गांधीजींच्या मते श्रमाची प्रतिष्ठा ही शिक्षणाचा अविभाज्य भाग होती. हाताने काम करण्याला कमीपणा न मानता प्रत्येक विद्यार्थ्याने श्रमाचे महत्त्व समजून घेतले पाहिजे, हा संदेश त्यांच्या शिक्षणपद्धतीतून मिळतो. त्यामुळे शिक्षण आणि व्यावसायिक कौशल्य यांची सांगड घालण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

स्वातंत्र्यलढ्यातही शिक्षणाला त्यांनी महत्त्वाचे स्थान दिले. शिक्षित आणि जागरूक नागरिकच स्वराज्याची खरी ताकद बनू शकतात, असा त्यांचा विश्वास होता. म्हणूनच त्यांच्या दृष्टीने शिक्षण हे राष्ट्रनिर्मितीचे प्रभावी साधन होते.

आजच्या कौशल्याधारित आणि अनुभवाधारित शिक्षणाच्या संदर्भात गांधीजींचे विचार पुन्हा महत्त्वाचे ठरतात. ज्ञानासोबत कौशल्य, मूल्ये, सामाजिक जबाबदारी आणि आत्मनिर्भरता विकसित करणारे शिक्षण हीच त्यांच्या शैक्षणिक विचारांची खरी दिशा होती.

गांधीजींच्या शिक्षणविचाराचा सार असाशिक्षणाने केवळ सुशिक्षित व्यक्ती नव्हे, तर सक्षम, स्वावलंबी, चारित्र्यसंपन्न आणि समाजाभिमुख नागरिक घडला पाहिजे.

# चिंधवलीतील देखावा ज्ञानाचा प्रकाश पसरवणारा- प्रा. शितल भोईटे





**ज्योतिर्मय साहित्य**

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त (११ एप्रिल २०२६ ते ११ एप्रिल २०२८) शासनाकडून दोन वर्षाचा राष्ट्रव्यापी राज्यस्तरीय विशेष स्मृती/जयंती महोत्सव साजरा केला जात आहे त्याच अनुषंगाने चिंधवली ता. वाई, सातारा येथे गणपती उत्सवानिमित्त पवार कुटुंबियांनी साकारलेला देखावा ज्ञानाचा प्रकाश पसरवून नागरिकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला आहे असे मत सौ. वेणूताई चव्हाण फार्मसी कॉलेज, फलटण येथील सहाय्यक प्राध्यापिका तसेच विद्यार्थी मार्गदर्शन, महिला तक्रार निवारण कक्ष व निवारण समितीच्या अध्यक्ष सौ. शितल भोईटे मॅडम यांनी व्यक्त केले.

सर्व देखावा प्रेमींच्या उपस्थितीत सौ.भोईटे मॅडम यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

स्री शिक्षण, विधवा महिला पुनःविवाह, बालविवाह प्रतिबंधक आणि शेतकऱ्यांसाठी फुले दांपत्याने केलेलं कार्य या देखाव्यातून अतिशय प्रभावीपणे उभे करण्यात आले आहे.

चिंधवली येथील व सध्या पुणे येथे वास्तव्यास असणारे कृतीशील उपक्रमाचे मार्गदर्शक, सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक श्री मुकुंद शेठ पवार (दादा) यांच्या विनंतीवरून उपस्थित असणारे सर्व मान्यवर, आप्तेष्ट आणि स्नेही यांनी दिपक पवार यांच्याकडून आजपर्यंत राबविण्यात आलेल्या सामाजिक, कृतीशील उपक्रमाची माहिती घेतली, या भेटीतून सर्वांनी कौतुकाचा वर्षाव करीत प्रेरणा मिळाल्याची भावना व्यक्त केली.




सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.

■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,

गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.

सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

## विचार ते विजय



लेखक - अमोल बोरीकर.मो. 86240 03013

### स्वप्न मोठं ठेवा, सुरुवात छोटी करा...

पुढे....

तुमच्या स्वप्नाची सुरुवात छोटी असली, तरी तुमची जिद्द छोटी असण्याची गरज नाही.

आई-वडिलांच्या डोळ्यांत तुमच्याबद्दलची आशा असेल, कुटुंबाच्या मनात तुमच्यावर विश्वास असेल, तर त्या विश्वासाला कृतीची जोड द्या.

एक दिवस तुमच्या यशाची कहाणी सांगताना लोकांना कदाचित तुमचं मोठं घर, मोठं पद किंवा मोठा व्यवसाय दिसेल.

पण तुम्हाला आठवेल—

त्या सगळ्याची सुरुवात एका छोट्याशा निर्णयातून झाली होती.

स्वप्न मोठं ठेवा... सुरुवात छोटी करा... आणि प्रत्येक दिवस त्या स्वप्नाच्या दिशेने प्रामाणिकपणे जगा.

“स्वप्न आकाशाएवढं ठेवा; पण पहिलं पाऊल मातीवरच टाका. सुरुवात छोटी असली तरी चालेल... फक्त ती मनापासून असू द्या. कारण उद्याच्या मोठ्या यशामागे आजच्या छोट्याशा प्रयत्नाचीच एक दिवस सर्वात सुंदर कहाणी बनते.”

डोळ्यांतील अश्रू पुसा आणि स्वतःच्या स्वप्नांकडे पाहा. त्या स्वप्नांना सांगा—"मी येतोय... हळूहळू, पण निश्चितपणे!"

छोट्या सुरुवातीची लाज बाळगू नका, कारण शिखरावर पोहोचणारा प्रत्येक माणूस कधी ना कधी पायथ्याशीच उभा होता.

उठा, आजच, याच क्षणी ते पहिले लहान पाऊल टाका. कारण तुमच्या 'विचार ते विजय' या महाप्रवासाची सुरुवात याच छोट्या पावलाने होणार आहे!

## ॥ श्री गणेश चिंतन ॥



*समर्थ रामदास स्वामी कृपेने मनाचे श्लोक व दासबोधाच्या आधाराने "गणेश उत्सवात १० दिवस नियमित एक गणेश चिंतन करू या कारण "जो स्वतः शुभ झाला तोच शुभारंभ करू शकतो"*

कृतज्ञ मी कृतार्थ मी, भगवंत हृदयस्थ आहे 🙏 अपर्णा परांजपे कात्रज पुणे

पुढे.....

म्हणजे अंतिम सत्य केवळ “मला ज्ञान आहे” इथे थांबत नाही.

अविद्या बंधन आहे.पण “मी ज्ञानी आहे” ही विद्येची उपाधीही शेवटी ओलांडायची आहे.यामुळे शारदा ही केवळ शैक्षणिक ज्ञानाची देवता राहत नाही.ती ज्ञानालाही आत्मबोधात विलीन करणारी शक्ती बनते.

६. शारदा म्हणजे माया—पण कोणती माया?

समर्थ तिला—“माहं माया” म्हणतात.

आणि पुढे—

“जे अनंत ब्रह्मांडें घडी ।लीळाविनोदेंचि मोडी ।

आपण आदिपुरुषीं दडी ।मारून राहे ॥ ६॥”असे सांगतात.

हीच शक्ती—ब्रह्मांडाची रचना करते आणि विलीनही करते.

म्हणजे शारदा येथे केवळ “सरस्वती देवी” या संकुचित अर्थाने नाही.

ती चैतन्याची व्यक्तीकरणशक्ती आहे.

७. मग परब्रह्म कुठे आहे?

याच शारदास्तवनात समर्थ एक विलक्षण ओवी देतात—

जे प्रत्यक्ष पाहातां आडळे।विचार घेतां तरी नाडळे ।

जयेचा पार न कळे ।ब्रह्मादिकांसी ॥७॥

आणि पुढे—

जे निर्गुणाची वोळखण ।जे अनुभवाची खूण ।

जे व्यापकपणें संपूर्ण ।सर्वांघटीं ॥१८॥

आता येथे आपण थांबले पाहिजे.

कारण समर्थ एका बाजूला शारदा = माया/शक्ती म्हणतात, आणि दुसऱ्या बाजूला तिच्याच स्वरूपात निर्गुणाची ओळख आणि अनुभवाची खूण सांगतात.

याचा अद्वैतार्थ अत्यंत सुंदर आहे—माया ही ब्रह्मापासून स्वतंत्र सत्ता नाही. तीच शक्ती प्रपंच दाखवते, आणि त्याच शक्तीच्या कृपेने साधकाला प्रपंचाच्या पलीकडील तत्त्वाची ओळख होते.

८. आणि आता “राघव”!

मनाच्या श्लोकातील शेवटची ओळ—

गमूं पंथ आनंत या राघवाचा ॥

इथे “राघव” केवळ पुढे रामाचे नाव घेऊ म्हणून आलेले नाही.

समर्थांच्या दृष्टीने राम हा परमार्थाचा मार्ग आणि परब्रह्मस्वरूपाचा उपास्य आहे.

(क्रमशः)



## महावस्त्र नात्यांचं : महावस्त्राचे पदर...

विश्वास देशपांडे, चाळीसगाव, प्रतिक्रियेसाठी : ९४०३७४९९३२

### 'पिता-पुत्र'

आजचा हा तेरावा भाग लिहिताना माझे मन पित्याविषयीच्या अथांग कृतज्ञतेच्या आणि आदराच्या भावनेने दाटून येत आहे. पिता म्हणजे मायेची अबोल सावली आणि जगण्याचा भक्कम आधार! जोपर्यंत त्याचं छत्र शिरावर असतं, तोपर्यंत माणूस संपूर्ण जगाशी लढायला निर्धास्त असतो. पण या जीवनसागरात जेव्हा आपलं गलबत वादळात हेलकावे खातं आणि दिशाहीन होतं, तेव्हा तो दीपस्तंभ बनून अचूक मार्गदर्शन करीत राहतो.

नुकतेच माझे एका शासकीय अधिकाऱ्याशी या विषयावर बोलणे झाले. ते तरुण असून एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण होऊन एका मोठ्या पदावर कार्यरत आहेत. त्यांच्याशी बोलताना जाणवले की ते आपल्या वडिलांबद्दल अगदी भरभरून आणि आदरयुक्त प्रेमाने बोलत होते; वडिलांविषयीची कृतज्ञता त्यांच्या प्रत्येक शब्दातून पाझरत होती. मी त्यांना सहज विचारले, "तुम्ही आता एवढे मोठे अधिकारी झालात, तरी वडिलांबद्दल इतक्या आदराने बोलता!" ते नम्रपणे म्हणाले, "होय सर, माझे वडील प्राथमिक शिक्षक होते. त्यांनी माझ्यावर तसे संस्कार केले; त्यांच्यामुळेच आज मी या पदापर्यंत पोहोचू शकलो.

# महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार : काळाची गरज आणि प्रासंगिकता

**ज्योतिर्मय साहित्य**

आजचे शिक्षण अधिक प्रमाणात माहिती देते, पण माणूस कमी घडवते. गुणपत्रिका चमकते, पदवी हातात येते, तरीही आत्मविश्वास, श्रमप्रतिष्ठा, नैतिक निर्णयक्षमता आणि समाजाशी नाते या गोष्टी अनेकदा रिकाम्या राहतात. स्पर्धा परीक्षा, कोचिंग वर्ग, इंग्रजी माध्यमाची प्रतिष्ठा आणि नोकरीच्या भीतीने घेतलेले निर्णय यांनी शिक्षणाचे उद्दिष्ट अरुंद झाले आहे. अशा वेळी महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार जुने वाटतात, पण ते जुने नाहीत. ते शिक्षणाच्या मूळ प्रश्नाकडे परत नेतात: शिक्षा कशासाठी? केवळ परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी की पूर्ण माणूस घडवण्यासाठी? हा प्रश्न आज अधिक तीव्र झाला आहे. म्हणूनच गांधीजींचे शिक्षणविषयक विचार केवळ ऐतिहासिक अभ्यास न राहता काळाची गरज ठरतात.

गांधीजींनी शिक्षणाची व्याख्या साधी पण क्रांतिकारक केली. त्यांच्या मते शिक्षा म्हणजे बालक आणि माणसातील शरीर, बुद्धी व आत्मा यांतील सर्वोत्तम शक्ती बाहेर काढणे. साक्षरता ही शिक्षा नाही, ती केवळ साधन आहे. ही व्याख्या आजच्या व्यवस्थेला अस्वस्थ करते, कारण आज शिक्षा मोजली जाते गुणांनी, प्रमाणपत्रांनी आणि पगाराच्या अपेक्षेने. गांधीजींनी या मोजमापाचा विरोध केला. त्यांना वाटत होते की, वसाहतिक शिक्षणाने भारतात एक लहानसा लिपिकवर्ग तयार केला, पण देशातील बहुसंख्य लोकांना विचार करण्याची, श्रम करण्याची आणि स्वतःचे जीवन सुधारण्याची क्षमता दिली नाही. शिक्षित माणूस हाताने काम करण्यास कमी लेखू लागला. गाव आणि शहर, बुद्धी आणि श्रम, पुस्तक आणि जीवन यांच्यात दरी निर्माण झाली. नै तालीम किंवा बुनियादी शिक्षा ही त्या दरीला भरून काढण्याची योजना होती.

नै तालीमचे सूत्र स्पष्ट होते. शिक्षा उत्पादक कामातून यावी. विणकाम, शेती, सुतारकाम, मातीकाम यांसारख्या हस्तकला केवळ विषय नसाव्यात, तर त्यांच्या माध्यमातून गणित, विज्ञान, भूगोल आणि नीतिमत्ता शिकवली जावी. मूल हाताने काम करत असतानाच डोक्याने विचार करायला शिकते आणि हृदयाने जबाबदारी जाणते. हे , यांचे शिक्षण होते. मातृभाषा हे माध्यम असायला हवे होते, कारण मुलाची समज त्याच्या अनुभवाच्या भाषेतच खोलवर जाते. शिक्षा स्वयंपूर्ण असायला हवी होती, म्हणजे शाळा केवळ खर्चाचे केंद्र न राहता उत्पादनाचे आणि समाजाच्या गरजेचे केंद्र व्हायला हवी होती. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, चारित्र्य हे शिक्षणाचे सर्वोच्च ध्येय होते. गुण आले आणि चारित्र्य गेले, तर ती शिक्षा अपयशी ठरते.

ही योजना केवळ गांवढळ रोमँटिकता नव्हती. ती त्या काळाच्या गरजेला दिलेले उत्तर होते. भारतातील बहुसंख्य लोक गावात होते, शेती व हस्तउद्योगावर जगत होते आणि इंग्रजी शिक्षण त्यांच्या जीवनापासून तुटलेले होते. गांधीजींना हवे होते की, शिक्षा ही काही लोकांची खासियत न राहता सर्वांच्या स्वावलंबनाचे साधन व्हावी. आज परिस्थिती बदलली आहे हे खरे. अर्थव्यवस्था औद्योगिक व सेवाक्षेत्राकडे गेली आहे, तंत्रज्ञानाने



ज्ञान मिळवण्याचे मार्ग बदलले आहेत आणि जागतिक बाजारपेठेने कौशल्यांच्या व्याख्या बदलल्या आहेत. पण बदललेल्या परिस्थितीतही गांधीजींनी मांडलेल्या काही मूलभूत तणावांचे रूप बदलले आहे, अस्तित्व नाहीसे झालेले नाही.

आजचा पहिला तणाव म्हणजे ज्ञान आणि जीवन यातील तुटलेपणा. मूल पाठ्यपुस्तकात पर्यावरण वाचते, पण आपल्या परिसरातील झाड, पाणी व कचरा यांच्याशी त्याचे नाते तयार होत नाही. ते डिजिटल साक्षर होते, पण हाताने काही करण्याची क्षमता व संयम कमी होतो. पदवीधर बेरोजगारांची संख्या वाढते, कारण पदवी ही कामाची हमी नाही आणि कामाची प्रतिष्ठा शिक्षणाने दिलेली नसते. गांधीजींनी श्रमप्रतिष्ठा हा मुद्दा केवळ नैतिक उपदेश म्हणून मांडला नव्हता. त्यांना माहीत होते की, श्रम हीन लेखला की समाज दोन वर्गांत विभागतो: विचार करणारे आणि काम करणारे. आजही हा विभाग नव्या भाषेत जिवंत आहे. पांढरपेशा नोकरी ही यश आणि हाताचे काम हे अपयश, ही समज




शिक्षणव्यवस्थेने अधिक मजबूत केली आहे. नै तालीमचा गाभा आजच्या कौशल्य शिक्षणात दिसतो, पण फरक हा आहे की आज कौशल्य बहुधा बाजारपेठेसाठी शिकवले जाते, माणूस घडवण्यासाठी नाही.

दुसरा तणाव म्हणजे परीक्षा आणि चारित्र्याचा संघर्ष. स्पर्धात्मक व्यवस्थेत मुलाला लहानपणापासून एकच प्रश्न विचारला जातो: तुझा रँक काय? या प्रश्नामुळे नकल, तणाव, नैराश्य आणि यशाची अरुंद व्याख्या तयार होते. मूल्यशिक्षण वेळापत्रकात असते, पण मूल्ये वर्गाच्या संस्कृतीत नसतात. गांधीजींचे म्हणणे होते की, चारित्र्याची पायाभरणी झाली की बाकीचे ज्ञान सहज येते. आज उलटे घडते. ज्ञान जमा होते, पण निर्णयक्षमता कमजोर राहते. ऑनलाइन माहितीच्या युगात ही कमतरता अधिक धोकादायक आहे. माहिती मिळवणे सोपे झाले आहे, पण खरी-खोटी ओळखणे, संयम ठेवणे आणि समाजाच्या हिताचा विचार करणे अधिक कठीण झाले आहे. अशा वेळी शिक्षा ही केवळ कौशल्यांचा संच न राहता नैतिक कवायत ठरायला हवी, हे गांधीजींचे सूत्र अधिक प्रासंगिक होते.

तिसरा तणाव मातृभाषा आणि जागतिक संधी यांच्यात आहे. गांधीजींनी इंग्रजी नाकारली नव्हती, इंग्रजीच्या एकाधिकाराचा विरोध केला होता. मूल प्रथम आपल्या भाषेत विचार करायला शिकले की दुसरी भाषा सामर्थ्य होते, बोजा नाही. आज धोरण मातृभाषेची शिफारस करते, पण समाज इंग्रजी माध्यमाकडे धावतो. कारण भीती आहे की मातृभाषेत शिकले तर संधी हुकतील. ही भीती व्यवस्थेच्या अपयशातून जन्माला येते. मातृभाषेत दर्जेदार आशय, विज्ञानसंज्ञा आणि उच्च शिक्षणाचे पूल तयार न झाल्याने भाषा ही ज्ञानाची खिडकी न राहता वर्गाची सीमा बनते. गांधीजींचे भाषेवरील आग्रह आज समावेशकतेचा आग्रह आहे. जे मूल आपल्या भाषेत कमजोर राहते, ते केवळ शब्द हरवत नाही, तर आत्मविश्वास आणि स्थानिक ज्ञानही हरवते. चौथा मुद्दा स्वयंपूर्णतेचा आहे. गांधीजींना शाळा ही समाजापासून तुटलेली इमारत नको होती. शाळा गावाच्या गरजेशी, उत्पादनाशी आणि सेवेशी जोडलेली हवी होती. आज शाळा अनेकदा परीक्षेच्या कारखान्यासारखी चालते. समुदाय, पालक आणि स्थानिक समस्या यांचा शिक्षणाशी संबंध औपचारिक राहतो. पर्यावरणीय संकट, मानसिक आरोग्य, सामाजिक विषमता आणि डिजिटल एकाकीपणा या प्रश्नांना पाठ्यपुस्तकाबाहेर जाऊन स्पर्श करणे आवश्यक आहे. अनुभवजन्य शिक्षण, व्यावसायिक शिक्षण आणि समुदाय सहभाग या कल्पना राष्ट्रीय शिक्षण धोरणात दिसतात. म्हणजे गांधीजींचे अनेक सूत्रे नव्या भाषेत परत आली आहेत. फरक हा की धोरणात ती कौशल्य व रोजगाराच्या चौकटीत मांडली जातात, तर गांधीजींनी ती स्वावलंबन, अहिंसा आणि समाजसेवेच्या चौकटीत मांडली होती. उद्दिष्ट बदलले की पद्धतीचा अर्थही बदलतो.

म्हणून प्रासंगिकता ही नक्कल नाही. आजच्या शाळेत चरखा अनिवार्य करणे किंवा तंत्रज्ञान नाकारणे हे गांधीवाद नव्हे. खरी प्रासंगिकता तीन गोष्टींमध्ये आहे. एक, शिक्षा माणसाचे सर्वांगीण चित्र पाहावी, केवळ परीक्षेचे नाही. दोन, श्रम, अनुभव आणि विचार यांना एकत्र आणावे. तीन, शिक्षा व्यक्तीला बाजारपेठेतील वस्तू न बनवता जबाबदार नागरिक बनवावी. तंत्रज्ञान या तीन सूत्रांना विरोध नाही. उलट, तंत्रज्ञानाने अनुभव अधिक व्यापक करता येतो, स्थानिक समस्यांचे विश्लेषण करता येते आणि उत्पादक कामाची नवी रूपे शोधता येतात. पण तंत्रज्ञान हे साधन आहे. ध्येय माणूस आहे, हे विसरले की शिक्षा पुन्हा लिपिक घडवते, फक्त यावेळी डिजिटल लिपिक.

गांधीजींचे शैक्षणिक विचार काळाची गरज आहेत, कारण आजचे संकट माहितीचे नाही, दिशेचे आहे. मुलांकडे स्क्रीन आहे, नोट्स आहेत, कोर्सेस आहेत, पण अनेकदा हे प्रश्न नाहीत की मी का शिकतो, माझ्या श्रमाला काय किंमत आहे, आणि माझ्या ज्ञानाने माझ्या भोवतालच्या माणसाला काय लाभ होतो. शिक्षा जर केवळ वैयक्तिक स्पर्धेची शर्यत राहिली, तर ती समाजात विजय देईल पण शांती देणार नाही. गांधीजींनी शिक्षा ही सामाजिक परिवर्तनाचे साधन मानली. शोषणमुक्त, स्वावलंबी आणि नीतिमान समाज घडवण्यासाठी शिक्षा हवी, नोकरशाहीसाठी नाही. हे सूत्र आजही पूर्णपणे उतरलेले नाही. म्हणूनच त्यांचे विचार संग्रहालयातील वस्तू नाहीत. ते शिक्षण व्यवस्थेला विचारायला लावतात की, आपण मुलांना जिंकणे शिकवतो की जगणे शिकवतो. काळ बदलला आहे, साधने बदलली आहेत, पण माणूस घडवण्याचे काम तेवढेच कठीण आणि तेवढेच आवश्यक आहे. गांधीजींचे शैक्षणिक विचार या कामाची आठवण करून देतात. ती आठवण जर धोरण, शाळा आणि घर या तीन ठिकाणी रुजली, तर शिक्षा पुन्हा जीवनाशी जोडली जाईल. अन्यथा गुण वाढतील, पदव्या वाढतील आणि माणूस मात्र अपूर्ण राहील. गांधीजींची प्रासंगिकता या अपूर्णतेच्या विरोधात आहे.

***

# भारत मातेचे थोर सुपुत्र ; लाल बहादूर शास्त्री

**ज्योतिर्मय साहित्य**

भारत मातेचे थोर सुपुत्र, देशाचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची आज जयंती आहे. लालबहादूर शास्त्री यांचे पूर्ण नाव लालबहादूर शारदाप्रसाद वर्मा असे होते. पण १९२५ साली बनारस येथील काशी विद्यापीठाची शास्त्री ही पदवी लालबहादूर यांनी मिळवली त्यामुळे त्यांना सर्वजण शास्त्री म्हणू लागले पुढे त्यांनी आपल्या नावापुढे शास्त्री हेच नाव लावले आणि ते लालबहादूर वर्माचे लालबहादूर शास्त्री बनले. त्यांचा जन्म २ऑक्टोबर १९०४ रोजी उत्तर प्रदेशातील मोगल सराई या गावात झाला. लालबहादूर शास्त्री दीड वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यांच्या आईनेच त्यांचा सांभाळ केला. लालबहादूर शास्त्री यांचे बालपण गरिबीतच गेले. घरची हलाखीची परिस्थिती असूनही लालबहादूर यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. शालेय वयातच लाला लजपतरायांनी स्थापन केलेल्या द सर्व्हन्ट ऑफ द पीपल सोसायटीचे सदस्यत्व त्यांनी घेतले. महात्मा गांधींच्या विचाराने ते प्रभावित झाले होते. गांधीजींच्या असहकार चळवळीत त्यांनी भाग घेतला. गांधीजींसोबत दांडी यात्रेतही त्यांनी भाग घेतला होता. १९३९ साली त्यांची पंडित नेहरूंशी भेट झाली आणि ते स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. देश स्वतंत्र झाल्यावर पंडित नेहरुंच्या पहिल्या मंत्रिमंडळात त्यांनी रेल्वे व वाहतूक, दळणवळण, वाणिज्य व उद्योग आणि गृहमंत्रीपद भूषविले. ते रेल्वेमंत्री असताना एकदा रेल्वेचा अपघात झाला होता त्यात काही प्रवाशांना स्वतःचा जीव गमवावा लागला होता या अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारुन त्यांनी रेल्वेमंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. देश आणि संसदेने त्यांच्या या अभूतपूर्व निर्णयाची प्रशंसा केली होती. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनीही त्यांच्या या इनामदार वृत्ती आणि आदर्श मूल्यांची संसदेत प्रशंसा केली होती. पंडित नेहरुंच्या आकस्मिक निधनानंतर देशाची धुरा त्यांच्याकडे आली. ९ जानेवारी १९६४ रोजी देशाचे दुसरे पंतप्रधान म्हणून त्यांनी शपथ घेतली. शपथ घेतल्यानंतर अल्पावधीतच त्यांनी आपल्या कर्तुत्ववाने पंतप्रधानपदावर ठसा उमटविला. प्रखर राष्ट्रवादी असलेल्या शास्त्रीजींनी आपल्या पंतप्रधान कालावधीत देशहिताचे अनेक निर्णय घेतले. १९६५ साली पाकिस्तानने आगळीक करुन भारताशी युद्ध पुकारले. पण देशात लालबहादूर शास्त्री यांच्यासारखे खंबीर नेतृत्व असल्याने पाकिस्तानला माघार घ्यावी लागली. आपल्या कणखर नेतृत्वाने त्यांनी पाकिस्तानला पराभूत केले. या युद्धानंतर त्यांच्या नेतृत्वाने जगातील मातब्बर नेते प्रभावित झाले. जय जवान, जय किसान या त्यांच्या मंत्राने देश भारावून गेला. लालबहादूर शास्त्री हे अवघे १९ महिने पंतप्रधान होते. या १९ महिन्यांच्या कालावधीत जनसामान्यांच्या हृदयात त्यांनी अढळ स्थान मिळवले. ११ जानेवारी १९६६ रोजी त्यांचे निधन झाले. जयंतीदिनी शास्त्रीजींना विनम्र अभिवादन!



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# एकल जीवन जगणाऱ्या ग.भा. शांताबाई कचरू डांगरे यांचा जागतिक जेष्ठ नागरिक दिनी सन्मान

**ज्योतिर्मय साहित्य**

वैजापूर - ना घर-ना दार,ना अंथरूण- ना पांघरूण, ना कुणाचा सहारा,ना चूल-ना भाकर, उभे राहण्यासाठी पाय ही साथ देत नाहीत, अगदी उघड्यावर एकल जीवन जगणाऱ्या ग.भा. शांताबाई कचरू डांगरे वय ७२. या श्री स्वामी समर्थ केंद्र व मंदिर समोर समोर सकाळ -संध्याकाळ भिक्षा मागून कशा तरी जीवन जगत आहेत. पती स्वर्गवाशी होऊन ३०-३५ वर्षे लोटली आहेत ,तेंव्हापासून एकल जीवन जगणाऱ्या ग.भा. शांताबाई कचरू डांगरे शहरात भिक्षा मागून जगत आहेत. १ऑक्टोबर,२०२६ हा जागतिक जेष्ठ नागरिक दिन या दिनाचे औचित्य साधत वैजीनाथ जेष्ठ नागरिक सेवा संघाचे सचिव धोंडीरामसिंह राजपूत यांनी गुरुवार (ता,०१) रोजी श्री स्वामी समर्थ सेवेकरी सुमनबाई आलूले व दीपा गंगारामसिंह राजपूत यांच्या सहाय्यने ग.भा. शांताबाई कचरू डोंगरे यांना थोडीफार आर्थिक मदत करून त्यांना शाल, श्रीफळ देऊन जेष्ठ नागरिक म्हणून सन्मान केला. हा होत असलेला सन्मान पाहून श्रीमती डांगरे यांचे मन भरून आले.आपली कोणी तरी दखल घेतली हे पाहून त्यांचे डोळे पाणावले.







# कुटुंबप्रमुख हवा आहे! भाग २ : माधवराव कोण?

**ज्योतिर्मय साहित्य**

''माधवराव कोण?'' या प्रश्नाचे उत्तर मिळण्याआधीच पमेलाने पुन्हा स्क्रीनकडे पाहिले. तिने जोडलेले परिचयपत्र उघडले. त्यावर लिहिले होते, माधव जहागीरदार

एम.ए. कॉम्पुटॅशनल संस्कृत

विद्यावाचस्पती - प्राचीन भारतातील मानवशास्त्र. माहिती वाचताच पमेला अचानक उद्गारली,

''हा तर माझा माधव मामा आहे!'' कृष्णकांत आश्चर्याने म्हणाला, ''काय सांगतेस? हा तुझा मामा?'' ''हो! माझा माधव मामा. पण त्यांनी आपल्याला आधी कधीच सांगितले नाही की त्यांना अमेरिकेत यायचे आहे.'' कृष्णकांतने परिचयपत्र पुन्हा पाहिले.

''तुझा मामा इतका शिकलेला आहे, संस्कृतचा एवढा मोठा अभ्यासक आहे आणि आपल्या जाहिरातीतील प्रत्येक अटीला पात्र आहे. पण एवढ्या दूर अमेरिकेत येण्याचा निर्णय त्यांनी अचानक का घेतला असेल?'' पमेला काही क्षण शांत राहिली.

''कदाचित त्यामागेही एखादी गोष्ट असेल.'' तेवढ्यात तिची नजर मेलच्या शेवटच्या ओळीवर गेली. ''अरे! हे तर आपण वाचलंच नाही!'' ''काय?'' तिने ओळ कृष्णकांतसमोर धरली. ''माझ्याबरोबर माझी पत्नीही येईल. तिच्या सर्व खर्चाची जबाबदारी माझी असेल.'' कृष्णकांत हसला, ''म्हणजे मामा एकटे येणार नाहीत.''

''हो आणि त्यामागचं कारण मला माहीत आहे.'' पमेला सांगू लागली, ''माझा मामेभाऊ न्यूझीलंडमध्ये स्थायिक झाला आहे. त्याची पत्नीही तिथलीच आहे. माझ्या मामे बहीणीचे लग्न झालेले असून तिचा नवरा जपानी आहे. तो एका विद्यापीठात प्राध्यापक आहे जीवशास्त्राचा. ती जपानमध्ये राहते आणि ती तेथे पायलट म्हणून नोकरी करते. त्यामुळे कोल्हापूरला आता मामा आणि मामी दोघेच राहतात.''

ती क्षणभर थांबली. ''कदाचित त्यांनाही नातवंडांसारख्या मुलांबरोबर राहण्याची ओढ लागली असेल.'' कृष्णकांतने क्षणाचाही विलंब केला नाही. ''मग फोन कर. आत्ताच.'' पमेलाने ताबडतोब फोन लावला. एक... दोन... तीन रिंग...पलीकडून आवाज आला, ''हॅलो?''

''मामा?''

''अगं पमेला! काय म्हणतेस?''

''मामा, तुम्ही आम्हाला मेल केली आहे ना?''

पलीकडून हसत आवाज आला, ''हो. मग कधी यायचं सांग? आम्ही दोघे तयारच आहोत.'' पमेला क्षणभर नि:शब्द झाली. तिने फोन कृष्णकांतच्या हातात दिला. ''मामा,'' कृष्णकांत म्हणाला, ''आम्हाला खूप आनंद झाला. खऱ्या अर्थाने आम्हाला कुटुंबप्रमुख मिळाला.'' माधव काही क्षण शांत राहिले. मग म्हणाले, ''कृष्णकांत, मुलांना संस्कार देण्यासाठी घरात एखादी व्यक्ती असणे पुरेसे नसते. त्यांच्यावर प्रेम करणारा माणूस हवा असतो.''




कृष्णकांतच्या मनाला ते वाक्य भिडले. ''मामा, मी लगेच व्हिसा आणि तिकिटांची व्यवस्था करतो.'' ''ठीक आहे. आम्ही तयार आहोत.'' फोन ठेवला. पमेला कृष्णकांतकडे पाहत म्हणाली, ''माझ्या मामांना तू अजून नीट ओळखत नाहीस.'' ''का?'' ती हसली. ''कारण ते फक्त माझे मामा नाहीत. ते जिथे जातात, तिथे घर बदलून टाकतात.'' कृष्णकांत पुन्हा संगणकाच्या पडद्यावर माधव जहागीरदारांचे परिचयपत्र पाहू लागला. काही आठवड्यांतच माधव आणि मामी लॉस एंजेलिसला पोहोचले. विमानतळावर कृष्णकांत, पमेला, श्रीराम आणि श्रुतकीर्ती त्यांची वाट पाहत होते. माधवांनी दोन्ही मुलांना जवळ घेतले. श्रुतकीर्ती त्यांच्या मांडीवर बसली, तर श्रीराम आदराने त्यांच्या शेजारी उभा राहिला. पहिली ओळख झाली. थोड्या गप्पा झाल्या. मग माधवांनी दोन्ही मुलांकडे पाहिले आणि अगदी सहजपणे एक प्रश्न विचारला, ''तुम्हाला माहीत आहे का, तुम्ही कोण आहात?'' श्रीराम आणि श्रुतकीर्ती एकमेकांकडे पाहू लागले. कृष्णकांत आणि पमेला मात्र स्तब्ध झाले. कारण तो साधा प्रश्न नव्हता. त्या एका प्रश्नातून त्यांच्या घरात सुरू होणार होता, भारतीय संस्कारांचा एक विलक्षण प्रवास.

क्रमशः भाग ३ : माधवांचा पहिला प्रश्न

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# अ. भा. मराठी पत्रकार परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष शिवराज काटकर यांचा शेगाव येथे सत्कार

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

शेगाव (मोहन चौकेकर) – भारतातील सर्वात मोठी पत्रकार संघटना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या अध्यक्षपदी तसेच पत्रकारांची भारतातील सर्वात जुनी संघटना म्हणजे ८८ वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या व महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये तेरा हजार पत्रकार सभासद सदस्य असलेल्या मराठी पत्रकार परिषदेच्या अध्यक्षपदी तरुण भारतचे संपादक शिवराज काटकर यांची नुकतीच निवड झाली आहे. महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यातील तेरा हजार पत्रकार सभासद सदस्य असलेली मराठी पत्रकार परिषद मुख्य संघटना आहे. या मराठी पत्रकार परिषदेच्या मार्गदर्शनाखाली, मराठी पत्रकार परिषदेच्या अंतर्गत महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये ३६ जिल्हा पत्रकार संघ काम करतात व या ३६ जिल्ह्यातील त्या त्या तालुक्यांमध्ये मराठी पत्रकार परिषदेच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा पत्रकार संघाच्या मार्गदर्शनाखाली तालुका पत्रकार संघ काम करतात. अशी मराठी पत्रकार परिषदेची रचना असुन अश्या पद्धतीने मराठी पत्रकार परिषदेचे काम संपुर्ण महाराष्ट्रात चालते. महाराष्ट्रातील हजारो पत्रकारांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी, महाराष्ट्रातील हजारो पत्रकारांना भेडसावणाऱ्या विविध समस्या सोडविण्यासाठी, हजारो पत्रकारांच्या शासन दरबारी, सरकारकडे, प्रशासनाकडे असलेल्या विविध मागण्या सोडविण्यासाठी गेल्या तीन चार दशकांपासून, तीस, चाळीस वर्षांपासून मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख अहोरात्र काम करतात. त्यासाठी आपल्या तब्येतीची काळजी न करता संपूर्ण महाराष्ट्रात फिरत असतात. मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांना पत्रकारांविषयी अत्यंत कळवळ व अत्यंत प्रेम असुन महाराष्ट्रात कुठल्याही जिल्ह्यांमध्ये कुठल्याही गावामध्ये पत्रकार गंभीर आजारी असल्यास, किंवा पत्रकार आर्थिक अडचणीत असल्यास त्या पत्रकाराला हवी ती मदत करण्यासाठी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख ताबडतोब धावून जातात व त्या पत्रकाराला हवी ती आर्थिक मदत करतात, वैद्यकीय मदत करतात. एखादा पत्रकार त्यास जडलेल्या आजारामुळे मृत्युमुखी पडला. पत्रकार वर्धपकाळाने मरण पावला, पत्रकार अचानक मरण पावला, पत्रकार अपघातात‌ाने मृत्यूमुखी पडला त्या त्या वेळी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख ताबडतोब धावुन जातात व त्या पत्रकाराच्या निधनाने त्या पत्रकाराचे कुटुंब उघडे पडलेले असते त्यामुळे पत्रकारांच्या उघड्या पडलेल्या कुटुंबीयांना आर्थिक मदत करतात, पत्रकारांच्या कुटुंबातील सदस्यांना आर्थिक मदत करतात. महाराष्ट्रातील कुठल्याही जिल्ह्यांमध्ये कुठल्याही गावामध्ये पत्रकारावर हल्ला झाल्यास त्या पत्रकारांच्या हल्लेखोरांना कडक शिक्षा व्हावी, त्या हल्लेखोरांना ताबडतोब अटक




व्हावी यासाठी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख आवाज उठवतात व तशी मागणी शासनाकडे, प्रशासनाकडे करत असतात, मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख महाराष्ट्रातील हजारो पत्रकारांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी, पत्रकारांच्या विविध अडचणी सोडविण्यासाठी सतत काम करत असतात. मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख महाराष्ट्रातील हजारो पत्रकारांच्या शासन दरबारी, सरकारकडे, प्रशासनाकडे असलेल्या विविध मागण्या सोडविण्यासाठी शासनाशी, सरकारशी सतत लढत राहणारे मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख हे पत्रकारांचे एक लढवय्ये नेते आहेत. मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस .एम. देशमुख हे महाराष्ट्रातील हजारो पत्रकारांचा बुलंद आवाज आहे.

मराठी पत्रकार परिषदेच्या मार्गदर्शनाखाली, मराठी पत्रकार परिषदेच्या अंतर्गत बुलढाणा जिल्हा पत्रकार संघ, बुलढाणा डिजिटल मिडिया परिषद, शेगाव तालुका पत्रकार संघ व शेगाव डिजिटल मिडिया परिषद या सर्वांच्या संयुक्त विद्यमाने मराठी पत्रकार परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष शिवराज काटकर यांचा दिनांक २६ सप्टेंबर २०२६ रोजी संत गजानन महाराजांची पावन नगरी शेगाव येथे सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता . यावेळी पत्रकारांचे लढवय्ये नेते मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांच्या हस्ते मराठी मराठी पत्रकार परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष शिवराज काटकर यांचा संत गजानन महाराजांची प्रतिमा व श्रीफळ देऊन, शाल व हार घालून यथोचित सत्कार करण्यात आला. तसेच बुलढाणा जिल्हा पत्रकार संघ, बुलढाणा डिजिटल मिडिया परिषद, शेगाव तालुका पत्रकार संघ, शेगाव डिजिटल मिडिया परिषद या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व सदस्यांनी मराठी पत्रकार परिषदेचे नवनिर्वाचीत अध्यक्ष शिवराज काटकर यांना संत गजानन महाराजांची प्रतिमा व श्रीफळ देऊन शाल व हार घालून त्यांचा यथोचित सत्कार केला. या वेळी बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुका पत्रकार संघासह बुलढाणा जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील तालुका पत्रकार संघटनांनी देखील मराठी पत्रकार परिषदचे नवनिर्वाचित अध्यक्ष शिवराज काटकर यांचा सत्कार केला. या कार्यक्रमास मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम, देशमुख, मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त शरद पाबळे, मराठी पत्रकार परिषदेचे सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, डिजिटल मीडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे, मराठी पत्रकार परिषदेचे राज्य उपाध्यक्ष चंद्रकांत बर्दे, मराठी पत्रकार परिषदेचे पदाधिकारी चंद्रकांत क्षीरसागर, मराठी पत्रकार परिषदेचे बुलढाणा जिल्हा प्रसिद्धी प्रमुख मोहन चौकेकर , जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीतसिंग राजपूत , विश्वंभर मुळे यांची प्रमुख उपस्थिती होती . बुलढाणा जिल्ह्यातील तालुका पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांसह बुलढाणा जिल्ह्यातील अनेक पत्रकार यावेळी उपस्थित होते . याप्रसंगी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख, मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त शरद पाबळे, मराठी पत्रकार परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष शिवराज काटकर, मराठी पत्रकार परिषदेचे सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे या सर्व पदाधिकाऱ्यांची पत्रकारांच्या शासन दरबारी असलेल्या मागण्यांविषयी, पत्रकारांना भेडसावणाऱ्या विविध समस्या विषयी, पत्रकारांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी, महाराष्ट्रातील हजारो पत्रकारांच्या विविध अडचणी सोडविण्यासाठी मराठी पत्रकार परिषद काय करते व यापुढे मराठी पत्रकार परिषद महाराष्ट्रातील हजारो पत्रकारांचे सर्व प्रश्न सोडविण्यासाठी काय करणार या संदर्भात मराठी पत्रकार परिषदेच्या या सर्व पदाधिकाऱ्यांची मार्गदर्शनपर भाषणे झाली . या वेळी बोलताना मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख, मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त शरद पाबळे , मराठी पत्रकार परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष शिवराज काटकर, मराठी पत्रकार परिषदेचे सरचिटणीस सुरेश नाईकवाडे, डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे या सर्व पदाधिकाऱ्यांनी महाराष्ट्रातील हजारो पत्रकारांच्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी, पत्रकारांच्या शासन दरबारी असलेल्या मागण्या सोडविण्यासाठी, पत्रकारांना भेडसावणाऱ्या विविध समस्या सोडविण्यासाठी मराठी पत्रकार परिषद महाराष्ट्रातील हजारो पत्रकारांच्या पाठीशी ठामपणे उभी असल्याचे यावेळी बोलताना सांगितले. या कार्यक्रमास महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील जिल्हा पत्रकार संघाचे पदाधिकारी व पत्रकार उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी पत्रकार परिषदेचे राज्य उपाध्यक्ष चंद्रकांत बर्दे यांनी केले तर या कार्यक्रमाचे बहारदार असे सूत्रसंचालन जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीतसिंग राजपूत यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य उपाध्यक्ष असलेले व या कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष असलेले अनिल उंबरकर, डिजिटल मिडिया परिषदेचे जिल्हा संघटक राजेश चौधरी, शेगाव तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष नंदुभाऊ कुलकर्णी, कार्याध्यक्ष राजकुमार व्यास, सचिव नितीन घरडे, डिजिटल मिडिया परिषदेचे शेगाव तालुका अध्यक्ष विवेक शेगावकर, नारायण दाभाडे, धनराज ससाणे यांच्या सह सर्वांनी परिश्रम घेतले. मराठी पत्रकार परिषदेच्या या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

# ज्येष्ठ नागरिक दिन

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**



ज्येष्ठ नागरिक ६० चा उंबरठा ओलांडला की ज्येष्ठ नागरिक असे म्हटले जाते. ज्येष्ठ नागरिकांनी स्वतः स्वतःची काळजी घ्यावी. पटकन कुठेतरी पाय दुमडणे, तोल जाणे, चक्कर येणे, बीपी त्रास, डायबेटीस त्रास, या गोष्टींमुळे स्वतःच स्वतःला जपावे. शेवटी अचानक काहीतरी होते हे कबूल आहे पण स्वतः स्वतःची काळजी घेतली तर बऱ्याच गोष्टी होणार नाहीत असे मला वाटते.

स्वतःचे मन वाचनात, लेखनात आणि नातवंडांबरोबर खेळण्यात घालवावे.

ही सेकंड इनिंग आयुष्याची फार महत्त्वाची असते. इथे आपली मुलं आणि नातवंड आहेत ती दिवसभर घराबाहेर असतात त्यांच्या नोकरीमुळे त्यांच्या शाळेमुळे आणि वृद्ध म्हणण्यापेक्षा ज्येष्ठ माणूस हा घरामध्ये एकटा राहतो.

अशा वेळेला स्वतःचे छंद जे जीवनात उपभोगायचं राहिलेले आहेत ते नक्कीच करून घ्यावेत.

आपण वयाच्या ५८, ६० वर्षापर्यंत नोकरी करत असतो. अशा वेळेला अनेक छंद आपल्याकडून राहून गेलेले असतात. घराची पूर्ण जबाबदारी आपल्यावर असते मग ती स्त्री असो किंवा पुरुष असो. आपला छंद पूर्ण करूयात... उदाहरण.. रांगोळी आहे, चित्रकला आहे,गाण्याचा छंद आहे, निसर्गात फेरफटका मारायचा छंद आहे, विविध सहलींचे आयोजन करण्याचा छंद आहे असे अनेक छंद असतात कोणाला लेखणीचा छंद असतो, यातून आपले जीवन मान उंचावत नेण्यासाठी ही एक सुसंधी आहे असे मला वाटते.




लहानपण, कुमार वय, तरुण पण आणि ज्येष्ठ असं म्हणूया वृद्ध म्हणायला नको.

वृद्धांना कोणाचातरी आधार लागतो पण जेष्ठ असं म्हटलं असता जरी आधार मिळाला किंवा द्यावा लागला असेल तरीसुद्धा जेष्ठाचे स्थान जीवनामध्ये फार उंच असते कारण त्यांच्याकडून आपल्याला त्यांच्या अनुभवातून शिकवण मिळत असते. प्रेरणा मिळत असते. वृद्धांना घरात खरंच स्थान नाही असे म्हटले तरीही चालेल हल्ली वृद्धाश्रमांकडे सर्वांचा ओढा आहे. इथे त्यांचे कुटुंबीय त्यांचा सांभाळ करू शकतात असे नाही पण अनेक अडचणी असल्यामुळे वृद्धांना वृद्धाश्रमात ठेवले जाते. खर तरं ही शोकांतिका आहे आजच्या तरुण पिढीची.अर्थात मी कोणालाच दोष देत नाही. पण ज्येष्ठांचे विचार घेऊन चालणारे कुटुंब खूप पुढे जाते. त्यांचा आदर केला जातो. जीवनात योग्य मार्ग निवडण्यासाठी ज्येष्ठांची खूप मदत होते.

माझ तर पहिल्यापासून म्हणणं आहे वृद्ध नको पण ज्येष्ठ शब्द जवळ करावा....

वृद्ध आणि ज्येष्ठ यांची खरं व्याख्या एकच आहे पण तरी पण शब्दांचा अर्थ पाहिला असता जरा वेगळा वाटतो. त्यामुळे जेष्ठाचे साम्राज्य कुटुंबामध्ये फार महत्त्वाचे असते त्यांच्या विचारांना महत्त्व प्राप्त होते.

बघा
वृद्ध = वयाचा उंचावलेला आलेख
ज्येष्ठ = वय + अनुभव + आदर
''वृद्धत्व ही वयाची अवस्था आहे;
पण ज्येष्ठत्व हा अनुभवाचा
आणि सन्मानाचा मान आहे.''

जीवनाच्या या पथा वरती
अनुभवांची मस्त शिदोरी आहे
ज्येष्ठांच्या प्रत्येक शब्दामध्ये
जीवनाची एक कहाणी आहे..
कधी काठीचा आधार घेती
कधी आठवणींमध्ये ते रमती
घराच्या सुखासाठी त्यांनी
सारी हयातच वाहिलेली असती...
आई-बाबांच्या मायेपुढे बरं
कुठलीच संपत्ती मोठी नाही
त्यांच्या आशीर्वादाविना
घराला खरे घरपण नाही काही...
आज थोडे केस पांढरे झाले
पावलांना आली थोडी मंद गती
पण मनामधले ते प्रेम अजूनही
आहे सर्वांप्रती खूप आपुलकी..
त्यांच्या अनुभवाचा आदर करूया
त्यांचे दुःख आपण जाणून घेऊया
त्यांच्या एकटेपणाच्या संध्याकाळी
आपुलकीचा हात हाती देऊया...
ज्यांनी घडविले आपले जग
त्यांना सन्मान नित्य देऊया
ज्येष्ठ नागरिक दिनी नव्हे
दररोज त्यांची विचारपूस करूया...
त्यांच्या चेहऱ्यावरचे खरे हसू
आपल्या जगण्याची शान असू दे
त्यांच्या आशीर्वादाच्या सावलीत
आपले जीवन सुखी होऊ दे...

***

# महात्मा गांधी यांच्या विचाराची गरज

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**




महात्मा गांधी यांच्या २ ऑक्टोबर ह्या जयंती निमित्त एका कार्यक्रमात एका देशभक्ताने व्याख्यानात सांगितले की गांधीजी नेहमी म्हणत '' वयाने मोठे होण्यापेक्षा आपल्या कार्याच्या साक्षात्कार करून मोठे व्हा आदर्श निर्माण करा ''आपला आदर्श इतर लोकानी समोर ठेवावा अशी आपली वागणूक, कार्यपद्धती कायद्याच्या कक्षेत राहून पूर्ण होईल हे डोळ्यासमोर ठेवून पूर्ण करावी. कायद्याचे ज्ञान असेल तर तो कसोशीने पाळण्याचा धर्म निभावीला पाहिजे. कायद्याचा आदर्श ठेवला पाहिजे . कारण कायदा हा सर्वसामान्याच्या उत्कर्षासाठी, विचार पूर्वक, अनुभवाचे मोती गुंफून केला जातो, तेव्हा कायद्याने जी नियमावली केली आहे त्याचा आदरच करावा. कारण कायदा आणि नियम ह्या पुढे कोणी मोठा असू शकत नाही. शिवाय कायद्याचे पालन करण्यात गैर असे किंवा कमी पणा असे काहीच नाही. मग ती व्यक्ती किती ही मोठी, सन्मानीत, श्रीमंत, ध्येयवादी असली तरी चालेल .

म. गांधीजी नियम पाळण्यात त्यांचा कटाक्ष होता .हे तत्व आपल्या प्रवचनात नुसते सांगत नसत तर ते आपल्या आचरणात आणत असत असे अनेक उदाहरणे देता येतील. येरवडा तुरुंगात काही कारणामुळे त्यांना बंदिस्त करण्यात आले होते. स्वातंत्र्य संग्राम १९२३ मधील तो काळ होता. त्या दिवसा मध्ये तुरुंगात प्रशासनाच्या पूर्वपरवानगी शिवाय कैद्या ना त्यांच्या नातेवाईकांना भेटू दिले जात नसे. भेटण्याची वेळ साधारणपणे संध्याकाळची असायची. तुरुंगाच्या वॉर्डन अथवा पोलीस कर्मचाऱ्याच्या उपस्थितीतच ही भेट होत असे. एकेदिवशी कस्तुरबा गांधी बापू ना भेटण्यासाठी तुरुंगात गेल्या , एका जाळीदार खोलीत वॉर्डनने त्यांना सोडून दिले व गांधी ना तेथे आणण्यात आले. गांधीजी मोटे व सन्मानीत नेते असल्यामुळे व कस्तुरबा त्यांच्या पत्नी असल्यामुळे त्यांना एकांतात ठेवून आपण येथे थांबणे योग्य नाही म्हणून तो वॉर्डन निघून गेला. भेटण्याच्या वेळ संपल्यानंतर तो वॉर्डन परत आला तेथे त्यांनी पाहिले, गांधी आणि त्यांची पत्नी गुपचूप समोर उभे होते परस्पर काही संवाद न साधता केवळ स्मित हास्य करीत होते पण संवाद करण्याचे कोणतेच लक्षण त्यांच्यात दिसत नव्हते. वॉर्डन ला खूप आश्चर्य वाटले. तेव्हा ती विचारले तुम्ही दोघे चूपचाप का थांबला आहात. काही अडचण आहे काय? ह्यावर गांधी उत्तरले , मला तुरुंगातील कायद्याची व नियमांची समग्र माहिती आहे त्यानुसार तुरुंगात असताना कैदी आपल्या नातेवाईक यांचे सोबत काही बोलू शकत नाही. कारण पती पत्नी असले तरी तशी कायद्याने त्यांना परवानगी नाहीच. तेव्हा मला ते पाळले पाहिजे. तेव्हा माझ्यावर तशी खास सकारात्मक कृपा करण्याची गरज नाही. मला सुद्धा इतर कैद्या प्रमाणे वागणूक देणे योग्य वाटते. तसेच माझ्या ह्या मताशी माझी पत्नी ही सहभागी आहे. ह्याचा मला पूर्ण विश्वास आहे. तिला देखिल तुरुंगातील सर्व नियम व अटी ची पूर्ण कल्पना आहे. आणि तुरुंगातील कैद्या ना समान वागणूक दिली पाहिजे ह्या विचाराशी ती देखिल ठाम आहे. तुम्ही तुमच्या कर्तव्यात चुक करून आम्हाला सोडून निघून गेलात त्यामुळे आम्ही आपसात संवाद संभाषण न करता उभे आहोत. आम्ही जर तुमच्या अनुपस्थिती मध्ये बोललो असतो तर तो एक गुन्हा झाला असता कायद्याचे उल्लंघन झाले असते. गांधीच्या ह्या स्वभावात हा सदगुण असल्या मुळे त्यांना महात्मा ही उपाधी लागली आहे.




महापुरुषाचे विचार नेहमी महान आणि सकारात्मक असतात. त्यांची प्रत्येक गोष्टीकडे तसेच निसर्गाकडे पाहण्याची दृष्टीही आपल्याच विचारांशी संतुलीत असते. महात्मा गांधी एकदा गुरुदेव रविन्द्र नाथ टागोर यांच्या सस्नेह निमंत्रणावरून शांति निकेतन मध्ये गेले असता एकदा भल्या पहाटे ते दोघे निसर्गाशी हितगूज साध न्या साठी फिरत असताना सूर्याची पहिली सोनेरी किरणे जेव्हा आंब्याच्या झाडावर गुलाब पाना वर फुलावर पडली तेव्हा त्या फुलांची छटा पाहून टागोर यांचे कविमन जागृत झाले आणि ते गांधीना म्हणाले ''महात्माजी ह्या शब्द फुला कडे पाहून मला एक छान कविता करण्याची इच्छा होत आहे. त्या प्रमाणे शब्द समूह माझे मनात पुलकित होत आहे. पण तुमच्या मनात निसर्गाबद्दल काय भावना आहेत हे मला जाणून होण्याची इच्छा आहे ''. त्यावर शांततेने महात्मा गांधी म्हणाले मला काव्य वगैरे काही सुचत नाही कारण माझ्या मनात हा कवि मनाचा कोपरा रिकामा आहे. पण मला भारतातील प्रत्येक मुलांचा चेहरा ह्या गुलाबांच्या फुला सारखा ताजा टूटवीत, सुगंधी आशा आकांक्षा ने भरलेला असावा त्यांच्या मध्ये स्वातंत्र्य मिळविण्याची आस , देशप्रेमाची इच्छा, परोपकार वृत्ती , भूतदया , गरजू लोका स सहाय्य करण्याची तेजस्वी मनःस्थिती असावी ''असे मात्र मला वाटते . एकाच फुला बद्दल दोन मोठ्या व्यक्तीच्या भावना परस्पर कल्पना नवलाई च्या वाटतात . निसर्ग जसा फूलतो तसे भारतातील मुलांची मन फुलावी ही गांधीची इच्छा. कारण

फूलात बहरते देश प्रमाची आस
ताज्या टवटवीत विचारांचा त्यात
भास
आशा स्वातंत्याची मनात रुतते
खोल
पाऊले सरकती पुढे हाच नैसर्गिक
खेळ
यश समिप आहे तेथ स्वातंत्र्य
चौघडे
हेच ध्येय उराशी घेवून जगणे
सर्वांना आवडे

असे गांधीजीचे आयुष्य आपणास स्वातंत्र्यात ही प्रेरणादायी आहे आणि म्हणूनच त्यांची आठवण जीवंत आहे. सानेगुरुजी तेच सांगतात की '' खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे '' अन् महावीर त्यातच भर घालतात ''अहिंसा परमोधर्मः ''

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# पितृपंधरवडा : श्रद्धा, स्मृती आणि विज्ञानाचा सुंदर सेतू

**ज्योतिर्मय साहित्य**

भाद्रपदाच्या कृष्ण पक्षाबरोबर भारतीय संस्कृतीत एक वेगळाच भावविश्वाचा काळ अवतरतोतो म्हणजे पितृपक्ष! हा काळ केवळ तिथी,तर्पण आणि श्राद्धविधींचा नाही; तो स्मृतींचा आहे. कृतज्ञतेचा आहे. आपल्या अस्तित्वामागे उभ्या असलेल्या असंख्य अदृश्य हातांना मनोमन नमस्कार करण्याचा आहे.

आज आपण विज्ञानाच्या युगात जगतो. आकाशात उपग्रह पाठवतो, अवकाशातील अब्जावधी किलोमीटर दूर असलेल्या ग्रहांचा अभ्यासकरतो, शरीरातील सूक्ष्म पेशींचे रहस्य उलगडतो. अशा वेळी एक प्रश्न मनात येणे स्वाभाविक आहे ''पितृपक्षामागे काही वैज्ञानिक आधार आहे का? श्राद्ध करणे म्हणजे अंधश्रद्धा आहे का

पितृपंधरवडा : श्रद्धा, स्मृती आणि विज्ञानाचा सुंदर सेतू

''ज्यांनी आपल्याला जन्म दिला, ज्यांनी आपल्या हातात हात देऊन जीवनाची वाट दाखवली, त्यांच्या स्मृतींना वर्षातून एकदा प्रेमाने उजाळा देणेही केवळ धार्मिक प्रथा आहे की त्यामागे मानवी मनाचे आणि निसर्गाचेही एखादे गूढ विज्ञान दडले आहे?'' आषाढी एकादशीची भक्तीमय चाहूल ओसरते, श्रावणाच्या सरी हिरवाईला न्हाऊ घालतात आणि भाद्रपदाच्या कृष्णपक्षाची चाहूल लागते, तेव्हा भारतीय संस्कृतीत एक वेगळाच काळ सुरू होतोपितृपक्ष किंवा पितृपंधरवडा.

या काळात प्रत्येक कुटुंब आपल्या दिवंगत आई-वडिलांची, आजी-आजोबांची, पणजोबांची आणि ज्ञात-अज्ञात पूर्वजांची आठवण काढते. त्यांच्या मृत्यूच्या तिथीला श्राद्ध केले जाते. तर्पण केले जाते. अन्नदान केले जाते. कावळ्याला, गाईला, कुत्र्याला किंवा इतर जीवांना अन्न देण्याची प्रथा अनेक ठिकाणी आढळते. शेवटी येते सर्वपित्री अमावस्याज्यांची मृत्यूतिथी माहीत नाही, अशा सर्व पूर्वजांचे सामूहिक स्मरण करण्याचा दिवस.

पण प्रश्न असाहे श्रद्धेचे प्रतीक आहे की अंधश्रद्धा?

याचे उत्तर काळे-पांढरे नाही. परंपरेतील प्रत्येक धार्मिक दाव्याला वैज्ञानिक पुरावा आहे असे म्हणणे योग्य नाही; परंतु या परंपरेत असलेले स्मरण, कृतज्ञता, कुटुंबीयांचे एकत्र येणे, दुःखाशी सामना करणे, अन्नदान आणि




सामाजिक बांधिलकी यांना मानसशास्त्रीय व सामाजिक आधार नक्कीच आहे.

म्हणून पितृपक्षाकडे पाहण्याचा अधिक समतोल मार्ग असा असू शकतोतो श्रद्धेचा विषय आहे; पण त्यातील प्रत्येक गोष्ट विज्ञानाने सिद्ध झाली आहे असे मानणे आवश्यक नाही. आणि वैज्ञानिक पुरावा नाही म्हणून संपूर्ण परंपरेला अंधश्रद्धा म्हणणेही तितकेच अपुरे आहे.

'श्राद्ध' या शब्दातच श्रद्धा दडलेली आहे

'श्राद्ध' हा शब्द 'श्रद्धा' या शब्दाशी संबंधित आहे. म्हणजेच मनापासून, विश्वासाने केलेले कर्म.

पूर्वजांनी आपल्याला काय दिले? केवळ शरीराची आनुवंशिक परंपरा नाही, तर नाव, संस्कार, भाषा, घर, जमीन, व्यवसाय, कुटुंबपरंपरा, मूल्ये आणि जगण्याची पद्धत दिली. आपण आज ज्या ठिकाणी उभे आहोत, त्या प्रवासात आपल्या आधीच्या अनेक पिढ्यांचे योगदान आहे.

म्हणून पितृपक्ष म्हणजे एका अर्थाने

''मी एकटा नाही; माझ्या मागे अनेक पिढ्यांची पाऊलखूण आहे.''

ही जाणीव निर्माण करणारा काळ.

भारतीय परंपरेत 'पितृऋण' ही संकल्पना याच भावनेतून आली. जन्म देणाऱ्या आणि जीवनाचा पाया घालणाऱ्या पूर्वजांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे, ही त्याची मध्यवर्ती भावना आहे.

पंधरा दिवसच का?

पितृपक्ष साधारणपणे भाद्रपद पौर्णिमेनंतर सुरू होणाऱ्या कृष्णपक्षाशी संबंधित आहे आणि अमावस्येला त्याची सांगता होते. त्यामुळे साधारण पंधरा तिथींचा हा कालखंड.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे श्राद्धासाठी केवळ हाच काळ निश्चित केलेला आहे असे नाही. हिंदू धर्मग्रंथांमध्ये अमावस्या, विशिष्ट तिथी, संक्रांती, ग्रहण इत्यादी अनेक प्रसंगी श्राद्ध करण्याचे उल्लेख आढळतात. परंतु भाद्रपदातील कृष्णपक्षाला पूर्वजांच्या सामूहिक स्मरणासाठी विशेष महत्त्व प्राप्त झाले.

गरुडपुराणाच्या उपलब्ध अनुवादात भाद्रपदातील कृष्णपक्षाला 'प्रेतपक्ष' म्हणून उल्लेख केला असून त्या काळात श्राद्ध करण्याचा निर्देश आढळतो. स्कंदपुराणाच्या एका प्रकरणातही भाद्रपदातील कृष्णपक्ष आणि विशेषतः अमावस्येचा पितृकार्याशी संबंध सांगितला आहे.

म्हणजे ही परंपरा अचानक निर्माण झालेली नसून दीर्घकाळ विकसित झालेल्या धार्मिक-




सांस्कृतिक परंपरेचा भाग आहे.

भाद्रपदातच का?

हा प्रश्न अत्यंत रोचक आहे.

भारतीय शेतीप्रधान समाजात पावसाळा हा अत्यंत महत्त्वाचा ऋतू. पावसाळ्याच्या मध्यावर किंवा उत्तरार्धात निसर्गात मोठे परिवर्तन झालेले असते. पिकांची वाढ सुरू झालेली असते. जमिनीला पाणी मिळालेले असते. वातावरणात आर्द्रता असते.

पूर्वीचे समाज आजच्यासारखे सतत प्रवास करणारे नव्हते. वर्षातील विशिष्ट काळात शेतीची कामे, प्रवास, धार्मिक समारंभ आणि सामाजिक भेटीगाठी यांचे नियोजन होत असे. अशा परिस्थितीत वर्षातील एखादा विशिष्ट कालखंड कुटुंब आणि पूर्वजांच्या स्मरणासाठी राखून ठेवणे ही सामाजिकदृष्ट्या अर्थपूर्ण कल्पना असू शकते.

मात्र, ''भाद्रपदातील वातावरणामुळे मृत व्यक्तींचे आत्मे पृथ्वीवर येतात'' किंवा ''या विशिष्ट काळात केलेले अन्न थेट मृत व्यक्तीपर्यंत पोहोचते'' अशा धार्मिक दाव्यांना आधुनिक विज्ञानाने सिद्ध केले आहे, असे म्हणता येत नाही.

इथेच श्रद्धा आणि विज्ञान यांच्यातील सीमारेषा समजून घेणे आवश्यक आहे.

मग पिंड, तर्पण आणि अन्नदानामागचे विज्ञान काय?

आजच्या विज्ञानाच्या दृष्टीने मृत व्यक्तीला प्रत्यक्ष अन्न खाऊ घालणे शक्य नाही. **(क्रमशः)**

# सहकार भारतीचे शिर्डी येथे भव्य नारीशक्ती सहकारिता संमेलन

**ज्योतिर्मय साहित्य**

बीड - सहकार भारती महाराष्ट्र प्रदेशाच्या वतीने शिर्डी येथे दि. ३ व ४ ऑक्टोबर २०२६ रोजी राज्यस्तरीय नारीशक्ती सहकारिता संमेलनाचे आयोजन करण्यात येणार आहे. या संमेलनाला राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, जलसंपदा मंत्री व अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. राधाकृष्ण विखे पाटील, महिला व बाल कल्याण विकास मंत्री सौ. मेघना बोर्डीकर, राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा सौ. विजयाताई रहाटकर, सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी, राष्ट्रीय संघटनमंत्री श्री. संजय पाचपोर प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. या संमेलनामध्ये सहकार क्षेत्रात कार्यरत विविध सहकारी संस्थांच्या २ हजाराहून अधिक महिला प्रतिनिधी सहभागी होणार असल्याची माहिती सहकार भारती महाराष्ट्र प्रदेशाचे अध्यक्ष दत्ताराम चाळके, महामंत्री विवेक जुगादे व महिला प्रमुख वैशाली आवाडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सहकार भारतीच्या महाराष्ट्र प्रदेश महिला प्रमुख वैशाली आवाडे यांनी सांगितले की, महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्रामध्ये महिलांचे खूप मोठे योगदान आहे. अनेक महिला सहकारी संस्था महाराष्ट्रामध्ये अतिशय उत्तमपणे कार्य करीत आहेत. अनेक प्रकारच्या सहकारी संस्थांचे अध्यक्षपद सुद्धा आता महिला भूषवित आहेत. त्यामुळे या क्षेत्राला अधिक चालना देण्याच्या उद्देशाने व हे क्षेत्र अधिक गतिमान करण्याच्या दृष्टीने सहकार भारतीने या नारीशक्ती महिला संमेलनाचे आयोजन केले आहे. सहकार क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढावा, त्या प्रशिक्षित व्हाव्यात व येणार्या काळात सहकारी संस्थांमध्ये त्यांचे सक्षम नेतृत्व निर्माण होण्याच्या उद्देशाने या संमेलनात विविध विषयांवर सखोल चर्चा केली जाणार आहे, तसेच सहकार क्षेत्रात कार्यरत अनेक मान्यवरांचे मार्गदर्शन सुद्धा उपस्थित महिलांना दोन दिवसांच्या विविध सत्रांमध्ये होणार असल्याचे वैशाली आवाडे यांनी सांगितले.

सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेश महामंत्री श्री. विवेक जुगादे यांनी सांगितले की, सन २०२१ मध्ये केंद्रात सहकाराचे स्वतंत्र मंत्रालय झाल्यानंतर या क्षेत्राला आता अधिक ऊर्जा मिळत आहे. देशभरातील ६.५० लाख सहकारी संस्थांपैकी एकट्या महाराष्ट्रामध्ये २.५० लाखाहून अधिक सहकारी संस्था आहेत. महाराष्ट्रातील १३ कोटींपैकी लोकसंख्येच्या ८ कोटींच्यावर लोक सहकाराची जोडल्या गेले आहेत. आणि म्हणूनच या क्षेत्रामध्ये महिलांच्या नेतृत्वाला अधिक वाव मिळण्याच्या अनुषंगाने सहकार भारतीने हे भव्य दिव्य संमेलन शिर्डी येथे आयोजित केले आहे. या संमेलनाच्या माध्यमातून महिलांमध्ये सहकार क्षेत्राविषयी अधिक जागरूकता निर्माण करून येणार्या काळात त्यांचे नेतृत्व विकसित करणे हाच या संमेलनामागचा मूळ हेतू आहे. पुढील वर्षी सहकार भारती सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करणार आहे. या सुवर्ण महोत्सवी काळामध्ये महिलांच्या नेतृत्वास अधिक वाव मिळावा या दृष्टीने संघटना प्रयत्नशील आहे. निश्चितपणे या संमेलनाच्या माध्यमातून हजारो महिलांचे नवे नेतृत्व या सहकार क्षेत्राला मिळेल अशी आशा विवेक जुगादे यांनी व्यक्त केली. सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष श्री. दत्ताराम चाळके यांनी पत्र परिषदेत बोलताना सांगितले की, अलीकडच्या काळात महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्रात सहकार भारतीचा दबदबा वाढला आहे. सहकार क्षेत्रात चांगल्या गोष्टी घडवायच्या असतील तर सहकार भारतीचे नाव आज संपूर्ण सहकार क्षेत्रात सन्मानाने घेतले जाते. सहकार भारतीच्या माध्यमातून महाराष्ट्रामध्ये हजारो कार्यकर्ते निःस्वार्थ भावनेने काम करत असून या क्षेत्रात संस्कार आणण्याचे मोलाचे कार्य सहकार भारती मागील अनेक वर्षांपासून करीत आहे. महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्रात सहकार भारतीने मागील अनेक वर्षांपासून सकारात्मक परिवर्तन आणण्यासाठी फार मोठे योगदान दिले आहे. आणि म्हणूनच या क्षेत्रावरचा विश्वास हा दिवसेंदिवस वृद्धिंगत होत असल्याचे दत्ताराम चाळके म्हणाले.

# सागरगोटे

**ज्योतिर्मय साहित्य**

मुख्यतः सागरगोटा ही एक औषधी वनस्पती आहे. झाडाच्या सहाय्याने उंच वाढणाऱ्या काटेरी जाळीला काटेरी पेट्या येतात . या पेट्यांमध्ये गुळगुळीत पांढरे, राखाडी रंगाचे सागरगोटे असतात. आयुर्वेदामध्ये सागर गोट्यांचा औषधी म्हणून उपयोग केलेला आढळून येतो. परंतु फावल्या वेळेमध्ये महिला आणि मुली खेळ म्हणून सागर गोटे खेळायच्या. नऊ, सात ,तीन अशा संख्येमध्ये वयानुसार मुली खेळत असत, एकटीने दोघींनी तिघींनी चौघींनी किंवा पाच जणींनी हा खेळ खेळता येत असे. अंगणामध्ये ,ओसरीत पडवीत, थोड्याशा गुळगुळीत जागेवर ,सारवणावर (शेणाने सारवलेली जागा) एक वर्तुळ आखले जात असे यामध्ये कमीत कमी सात सागर गोटे हळूच टाकले जात असत वर्तुळाच्या बाहेर जर एखादा सागर गोटा गेला तर त्या मुलीचा खेळ रद्द होऊन दुसऱ्या मुलीला दिला जात असे. तिने परत हा प्रकार करायचा . पसरलेल्या सागर गोट्यांमधून एक सागर गोटा निवडून तो उंच हवेमध्ये फेकायचा उंच फेकलेला सागर गोटा परत येईपर्यंत जमिनीवरील एक सागर गोटा त्याच हाताने उचलायचा , वरतून खाली आलेला सागरगोटाही अलगद झेलायचा. एक एक करून हातामध्ये सगळे जमा करायचे,मधेमधे फार वेळ थांबायचा नाही,हा झाला पहिला डाव.






आता दूसरा, परत आखलेल्या वर्तुळात सागर गोटे अलगद पसरवायचे उजव्या हाताने एक सागर गोटा निवडून तो हवेत उंच फेकायचा आणि आता जमिनीवरील दोन सागरगोटे बोटांनी जमा करायचे आणि वरती फेकलेला सागरगोटा अलगत झेलायचा असं करत करत तीन,चार,पाच,सहा ! शेवटी सात सागर गोटे एकत्र झेलायचे हाताची उलटसुलट ओंजळ करून उंच फेकायचे ,झेलायचे,,हे करत असतांना ,एक्क,दोन्न,तिंन्न अस तालासुरात म्हणायचं,,!

यामध्ये डोळ्यांची कमालीची हालचाल व्हायची, एकाग्रता वाढायची,पाठांतर ही व्हायच,,! किती छान होतं आपलं बालपण ! हा सागर गोट्यांचा खेळ आपण आपल्या परिसरातील लहान मुलींना, महिलांना फावल्या वेळेत नक्कीच शिकवला पाहिजे, बघा कशी गंमत येते!!

# ज्ञानेश्वर नाट्य मंडळाचा शुभारंभाचा प्रयोग पाच ऑक्टोबरला गुरनोलीत : तालमींना आला वेग

**ज्योतिर्मय साहित्य**

गडचिरोली (प्रा. राजकुमार मुसणे,) चंद्रपूर गडचिरोली भंडारा, गोंदिया या भागात लोकप्रिय असलेली ग्रामीण लोकजीवनाशी निगडित रंगभूमी म्हणजेच झाडीपट्टी रंगभूमी.

झाडीपट्टीची रंगभूमी म्हणजे केवळ मनोरंजनाचे साधन नव्हे, तर ग्रामीण जीवनाचा आरसा, लोकसंस्कृतीचा आविष्कार आणि सामान्य माणसाच्या सुख-दुःखांना अभिव्यक्त करणारे प्रभावी माध्यम होय. गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया आणि भंडारा या परिसरातील जनमानसाशी घट्ट नाळ जोडलेली झाडीपट्टी रंगभूमी आजही आपल्या समृद्ध परंपरेचा वारसा जपत नव्या नाट्यपर्वाच्या स्वागतासाठी सज्ज होत आहे. झाडीपट्टी रंगभूमीवर नव्या नाटकांची चाहूलीबरोबरच तालमींचा श्रीगणेशा झाला आहे.झाडीपट्टीतील आगामी नाट्यहंगामाच्या पार्श्वभूमीवर व नाटकांच्या तालमीने रंगकर्मींच्या हालचालींना वेग आला आहे .प्रेक्षकांना नव्या पर्वाची प्रतीक्षा आहे.

दरवर्षी हजारो प्रयोगाच्या माध्यमातून करोडोची उलाढाल करणाऱ्या या रंगभूमीवर वेगवेगळ्या विषयावरील नाटके सादर होऊन रसिक प्रेक्षकांचे रंजन व प्रबोधन केले जाते. या नवीन २०२६-२७ सत्रासाठी झाडीपट्टीतील विविध नोंदणीकृत पंचेचाळीस व्यावसायिक नाट्यमंडळे व इतर हौशी असे सुमारे साठ नाट्यमंडळे नवीन नाटके सादर करण्यासाठी सज्ज झाली आहेत. या सिझनमध्ये कुही, भंडारा भागात प्रादेशिक स्तरावरही नाट्यमंडळचा उगम होताना दिसतो आहे. निर्मात्यांनी कलावंतांना एकत्र बोलावून संहितावाचन व तालमीना वेग आला आहे. बहुतेक नाट्य मंडळाच्या तालमी वेगात सुरूच आहेत. आधुनिक मल्टीमीडियाच्या वेगवान बदलामुळे रसिक प्रेक्षकांच्या अभिरुचीतही बदल होत असल्याने नाट्यमंडळातील स्पर्धा प्रचंड वाढली आहे. झाडीपट्टीची नाट्य पंढरी वडसा येथे नाटकाच्या बुकिंग करिता विविध प्रेसचे कार्यालये बहरात सज्ज झाले आहेत. वेगवेगळ्या गावातील आयोजक नाट्यरसिक नाटक बुक करण्याकरिता वडसा येथे येत आहेत. सोयीची नाट्यप्रयोगाची तारीख मिळावी यासाठी ऍडव्हान्स बुकिंग सुरू आहे.

प्रत्येक नाट्य मंडळ आपलं नाटक कसदार आणि प्रयोग कसा दमदार होईल यासाठी परिश्रम घेत आहेत. रसिक प्रेक्षकांच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन निर्माता व दिग्दर्शक नाटक बसविण्यासाठी प्रयासाने तालीम घेत आहेत. नुकतेच आशीष खुणे यांच्या ज्ञानेश्वर नाट्यमंडळांचे व्यंकटेश नुरचलवार लिखित हत्याकांड हे आदिवासी जीवनातील अत्याचाराचे दर्शन घडविणारे नव्याकोऱ्या नाटकाची तालीम पद्मश्री डॉ. परशुराम खुणे यांच्या मार्गदर्शनात ज्येष्ठ रंगकर्मी अशोक दूधकवर यांच्या दिग्दर्शनात गुरनोली येथे सुरू आहे.अशोक दूधकुवर,विलास वट्टी,रुपेश ढोले, पी लालचंद, विलास पेंटर, स्वर. आशिक राऊत,नैना खोब्रागडे,सविता भोयर,टीना उराडे,वैशाली हे कलावंत तथा ऑर्गन राहुल सहारे, तबला उमा वाढई, ऑक्टोपॅड अखिल गेडाम या संगीतकारांच्या एकूणच संचात हत्याकांड या नाटकाची तालीम सुरू आहे.सध्या सुरू असलेल्या तालमी म्हणजे आगामी नाट्यहंगामाची नांदी आहे.नाटक प्रत्यक्ष रंगमंचावर सादर होण्यापूर्वी त्याच्या निर्मितीची एक स्वतंत्र प्रक्रिया असते. नाटकाची संहिता निवडणे, पात्रांची निवड करणे, कलाकारांचे वाचन, संवादांची उजळणी, प्रसंगांची मांडणी, दिग्दर्शकीय दृष्टिकोन, नेपथ्य, प्रकाशयोजना, संगीत आणि रंगभूषा अशा अनेक टप्प्यांतून नाटक आकार घेत असते. सध्या झाडीपट्टीतील विविध नाट्यसंस्थांमध्ये याच प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. तालमीच्या जागी कलाकारांच्या संवादांचा आवाज घुमू लागला



आहे. कुठे गंभीर प्रसंगांची तर कुठे विनोदी संवादांवर रंगकर्मी मेहनत घेत आहेत. एखाद्या प्रसंगातील भावनिक चढ-उतार, संवादफेकीतील अचूकता, पात्राच्या स्वभावानुसार देहबोली आणि प्रसंगानुरूप अभिनय यांचा कस तालमीच्या माध्यमातून लागत असतो. कलाकारांच्या या मेहनतीतूनच पुढे प्रेक्षकांना अविस्मरणीय कलात्मक नाट्यानुभव मिळत असतो.

निर्मात्याचा प्रयास ,कलाकारांची धडपड, दिग्दर्शकांचे नियोजन, लेखकाच्या शब्दांना मिळणारा अभिनयाचा साज आणि तंत्रज्ञांची मेहनत या सर्वांचा संगम लवकरच रंगमंचावर अनुभवायला मिळणार आहे. आगामी काळात झाडीपट्टीच्या विविध नाट्यमंडळाकडून कोणती नवी नाटके सादर होतात, कोणते विषय रंगमंचावर येतात आणि प्रेक्षकांचा त्यांना कसा प्रतिसाद मिळतो, याकडे नाट्यरसिकांचे लक्ष लागले आहे .

झाडीपट्टी रंगभूमीवर या नव्या सीझनमध्ये येणारी आगामी नाटके पुढील प्रमाणे आहेत.

शृंगार नाट्य मंडळाचे संजय ठवरे लिखित

चिखलातील दगड -, गुरुदेव रंगभूमीचे निखिल मानकर लिखित म्होरक्या , धनंजय रंगभूमीचे प्रा. धनंजय ढवळे लिखित कोण नाही कोणाचा, रंगतरंग थिटर्सचे आनंद भिमटे लिखित हंबरडा, गायत्री रंगभूमीचे मुकेश गेडाम लिखित नरकवास आणि सिनेस्टार देवेंद्र दोडके लिखित जल्लाद, शिवचंद्र रंगभूमीचे शिल्पा पाटील लिखित फ ुलवा: एक वीरांगना ,व्यंकटेश्वरा नाट्य मंडळाचे विश्वनाथ मुळे लिखित प्रतिशोध आणि वरात घुसली घरात,कलाधिपती रंगभूमीचे अमर मसराम लिखित मालकीण ,झाडीपट्टी रंगमंचचे निर्मल टेंभुर्णे लिखित बाईसाहेब , तांडा ,शिवराज नाट्य मंडळाचे पंकेश मडावी लिखित देवाघरचा अंधार, गायत्री रंगभूमीचे मुकेश गेडाम लिखित , युवा रंगमंचाचे युवराज प्रधान लिखित कुलकलंक , एकता रंगभूमीचे लेखाराम हुलके लिखित तुफान , डॉ. अनिरुद्ध वनकर यांच्या लोकजागृती नाट्य मंडळाचे राजीवकुमार लिखित बायको माझी नवसाची ,नाट्यश्रीचे ईश्वर धकाते लिखित वणवा, चंद्रकमल थिएटरचे के.आत्माराम, लिखित अनाथ , नाट्य नरेश रंगभूमीचे प्रकाश प्रधान लिखित भडका, चेताक्ष रंगभूमीचे संतोष कवठे लिखित रुबाब,परमानंद गहाणे लिखित कलादर्पणचे उध्वस्त आयुष्य,ज्ञानेश्वर नाट्य रंगभूमीचे मंगेश नरचूलवार, लिखित आदिवासी मुलीवरील अत्याचाराचे हत्याकांड नाटक याशिवाय अन्य नाट्य मंडळाचे ही आगामी नाटके रंगभूमीवर सादर होणार आहेत. या सीझनमध्ये असलेली झाडीपट्टी रंगभूमीची ही नवीन संहिता, नाट्याशयची आगामी नाटके पाहण्यासाठी प्रेक्षकही उत्सुक आहेत. नाटकातील विषय काय आहेत, ते प्रेक्षकांच्या पसंतीला कितपत उतरतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

अनेक नाट्यमंडळातील कलाकारांची ही अदलाबदली झालेली आहे, त्यामुळे नवीन कलाकाराच्या संचात नाटक बसविण्याचे जिकीरीचे काम दिग्दर्शकाला करावे लागत आहे. विविध

असोसिएशनने घेतलेल्या बैठकां आणि प्रत्येकांचे दर वाढल्यामुळे प्रयोगखर्च याबाबत निर्मातेही संभ्रमित आहेत. अनेक वर्षापासून सीमित असलेला तिकीट दर, कलावंतांची वाढते मानधन, वाहतूक खर्च साऊंड खर्च, आयोजकांना उद्धवणारा नैमित्तिक खर्च या सर्व बाबींच्या अनुषंगाने कसरतच आहे.

बदलत्या जीवनशैलीच्या , मूल्याच्या मल्टिमीडियाच्या काळात झाडीपट्टीची सांस्कृतिक ओळख जपण्याचे आव्हानही आहे.झाडीपट्टी रंगभूमीवरील आगामी नाट्यहंगाम हा नाटककारांच्या नव्या विचारांचा,कलाकारांच्या नव्या स्वप्नांचा, आणि प्रेक्षकांच्या नव्या अपेक्षांचा उत्सव ठरो! रंगभूमीचा पडदा उघडण्यापूर्वी सुरू झालेली ही तयारी झाडीपट्टीच्या सांस्कृतिक विश्वाला नवी ऊर्जा देणारी ठरावी, हीच अपेक्षा!

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559